पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार, दि. ०७ मे २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०१३ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ ''अचूक नोंदणी, प्रगत शिरूर''

४ छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या एच.एस.सी. निकालाची परंपरा कायम

५ 'वैशिक दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार श्रीरामपूरला'



पान ८ वर..

# ९ वर्षीय नातीवर आजोबांकडून अत्याचाराचा प्रयत्न: नागरिकांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

## संतप्त जमावाचा स्वारगेट, पर्वती परिसरात राडा

## मुलीच्या आईचा संताप: माझ्या मुलीच्या अंगावर हात टाकणाऱ्या माझ्या बापाला फाशी द्या; वडिलांचाही सासऱ्यावर संताप





जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : नसरापूर येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार होऊन हत्या झाल्याचे प्रकरण ताजे असतानाच पुण्यातील पर्वती पायथ्याशी अशीच एक धक्कादायक घटना घडली. या घटनेत पीडित ९ वर्षीय चिमुकलीवर तिच्याच सख्ख्या आजोबांनी अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. शेजाऱ्यांच्या सतर्केतमुळे हा प्रकार उजेडात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. दरम्यान, या प्रकरणावर पोलिसांनी सविस्तर निवेदन सादर केलं असून पीडितेच्या आई–वडिलांनीही माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे.

पहिल्यांदा अत्याचार झाल्याचं कळलं नव्हतं

पीडितेची आई म्हणाली, मुलीने सांगितलं की अंगावरचे कपडे काढले होते, नखं मारली होती. माझ्या स्वतःच्या बापानेच हे कृत्य केलं आहे. मी कपड्यांच्या दुकानात कामाला आहे. मी कामावरून घरी जाण्यापूर्वीच हे घडलं आहे. तो भाड्याच्या घरात राहतो, तिथेच हे घडलं आहे. त्याने पूर्वीही असं केलं होतं, पण मला असं सांगितलं नव्हतं. पहिल्यांदा (अत्याचार झाल्याचं) कळलं नव्हतं, पण आता दुसऱ्यांदा घडलं तेव्हा कळलं.

आरोपीला फाशी द्या

तर, पीडितेच्या वडिलांनीही प्रतिक्रिया दिली आहे. ते रिक्षा चालक असून त्यांनी आरोपीला फाशीच्या शिक्षेची मागणी केली आहे. वर्षभरापूर्वी त्याने माझा मोबाईल चोरला होता, तेव्हाच मी त्याला घरातून हाकलून लावलं होतं. तू माझा सासरा नाही असं सांगून हाकलून दिलं होतं. त्यानंतर त्याने कुठे घर घेतलं माहीत नाही. मुलं कुठे खेळतात हे त्याला माहीत होतं, त्यामुळे त्याने खाऊचं आमिष दाखवून मुलीला नेलं असेल.

पोलिस म्हणाले, ५ मे रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पर्वती पायथाजवळ एका वयोवृद्ध माणसाने लहान चिमुकलीवर अत्याचार केला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस तिथे पोहोचले असता तेथील नागरिकांनी आरोपीला पकडून ठेवलं होतं. पोलिसांनी तत्काळ चौकशी करून आरोपीला ताब्यात घेतलं आहे. त्यानंतर असं समजलं की आरोपीने स्वतःच्या ९ वर्षाच्या नातीला (मुलीची मुलगी) खोलीत बोलावलं. तिच्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रसंग केला. परंतु शेजारील महिलेला रडण्याचा आवाज आला, त्यामुळे महिलेने हस्तक्षेप करून शेजारच्या लोकांनाही सांगितलं. शेजाऱ्यांच्या मदतीने या मुलीची सुटका केली आणि पुढील प्रसंग टळला, असं पार्वती पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र सहाणे यांनी सांगितलं.

# ठाकरेंच्या खासदाराला एकनाथ शिंदे भेटले

## 'मातोश्री'ही आता झाली सावध

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या निशाण्यावर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील खासदार असल्याची चर्चा सातत्याने होत असते. ऑपरेशन टायगर सक्रीय असल्याचे शिंदेंच्या शिवसेनेतील नेत्यांकडून सांगण्यात येते. त्यातच मुंबईमधील ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय दिना पाटील यांची भेट एकनाथ शिंदेंनी घेतल्याने चर्चांना उधाण आले आहे .

एकनाथ शिंदेंची भेट ही केवळ संजय पाटील यांच्या पत्नीची विचारपूस करण्यासाठी होती, असे समोर आले आहे. खासदार पाटील यांच्या पत्नीचा अपघात झाला आहे. त्यांच्यावर मुलुंड येथील फोर्टिस रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याविषयी माहिती मिळताच एकनाथ शिंदेंनी रुग्णालयात जात संजय दिना पाटील यांची भेट घेत त्यांच्या पत्नीची तब्येतीची विचारपूस केली.

खासदार ठाकरेंना मात्र शिंदेंनी वेळात वेळ काढून त्यांची भेट घेतल्याची माहिती समोर आल्यानंतर 'मातोश्री'देखील सावध झाली. संध्याकाळी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी संजय दिना पाटील यांना फोन करत त्यांच्या पत्नीच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच उद्धव ठाकरेंचे विश्वासू मिलिंद नार्वेकर आणि सचिन आहिर यांनी रुग्णालयात जात संजय पाटील यांची भेट घेतली.

## संक्षिप्त

### मुंबईत १०० कि.मी. चा मेट्रो नेटवर्क तयार

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : भारताच्या आर्थिक राजधानीत सध्या पायाभूत सुविधांचा विस्तार सुरू आहे. सागरी किनाऱ्यावर मार्ग, पूलांपासून ते भूमिगत मार्गांपर्यंत देशात अनेक बदल घडत आहेत. येत्या ५० वर्षांत शहराचे चित्र पूर्णपणे बदलणार असून मुंबई , सिंगापूर किंवा दुबईसारख्या शहरांना टक्कर देईल का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सध्या मुंबईच्या विकासासाठी एकूण ६० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्यात आली आहे. याअंतर्गत शहरात मेट्रोचे जाळे विकसित होत असून वाहतूकीची व्यवस्थाही सुधारणार आहे.मुंबईसह उपनगरांमध्ये सध्या मेट्रोच १६ नव्या मेट्रो मार्गिका उभारण्याची योजना आहे. या १६ मार्गांवर मेट्रो नेटवर्कचे जाळे बांधण्यात येणार आहे. यामुळे शहरातील वाहतुकीची समस्या अगदी गायब होऊन जाईल. या परिवर्तनाला शहरात सुरुवात झाली आहे. अटल सेतू या परिवर्तनातील प्रमुख प्रकल्प आहे. अटल सेतू देशातील सर्वात लांब पल्ल्याचा सागरी सेतू आहे. २१.८ किमी लांब हा पूल दक्षिण मुंबईला नवी मुंबईशी जोडतो. यामुळे १ तासाचा कालावधी लागणारा प्रवास आता केवळ २० मिनिटांत पूर्ण होतो. मुंबईत मेट्रो नेटवर्कने १०० किलोमीटरचा टप्पा ओलांडला असून यापुढेही विस्तार सुरू राहणार आहे. २०२५मध्ये सुरू झालेली भुयारी मेट्रो (अ‍ॅक्वा लाइन) कफ परेडला थेट छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विमानतळापर्यंत जोडते. यामुळे विमानतळावर पोहोचण्यासाठी प्रवाशांना वाहतूक कोंडीत प्रवास करावा लागत नसून कॅब व टॅक्सीच्या भाड्यामुळे खिशाला कात्री बसत नाही. त्यानंतर एप्रिल २०२६मध्ये मेट्रो लाइन ९चं उद्घाटन झालं. यामुळे प्रथमच मुंबईतून बाहेर ठाणे शहरापर्यंत मेट्रो पोहोचली. ठाणे शहरात सध्या अनेक नव्या मेट्रो मार्गिकांचा विस्तार होत आहे.

### मुंबईत तलाव आटू लागले; पाणीसाठा केवळ २५ टक्क्यांवर

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारे तलाव आटू लागले आहेत. सध्या २५.६६ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक राहिला असून महिनाभरात हा साठा २० टक्क्यांपेक्षा खाली येणार आहे. त्यामुळे पुढील तीन–अडीच महिने मुंबईकरांना पाणी पुरवण्यासाठी १५ मे पासून १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे नियोजन केले आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये २०२५ च्या तुलनेत ३ टक्क्यांनी पाणीसाठा जास्त असला तरी, पाऊस कधी पडेल हे सांगता येत नसल्यामुळे आतापासूनच पाण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. सध्या तलावांमध्ये ३ लाख ७६ हजार दशलक्ष लिटर इतका पाणीसाठा आहे.

# एकमेकांकडे पाहण्याच्या वादातून तरुणाचा खून डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून तीक्ष्ण शस्त्राने हल्ला





जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : एकमेकांकडे बघण्याच्या वादातून तरुणाच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून, तसेच तीक्ष्ण शस्त्राने वार करून खून करण्यात आल्याची घटना धनकवडीतील आंबेगाव पठार भागात घडली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी चार अल्पवयीनांना ताब्यात घेतले आहे.

नयन सचिन जाधव (वय १८, रा. आंबेगाव पठार, धनकवडी), असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत नयन याच्या आईने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. खून केल्याप्रकरणी चार अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले आहे. बालन्याय मंडळाच्या आदेशाने त्यांची रवानगी निरीक्षणगृहात करण्यात आली आहे', अशी माहिती भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यातील गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक कैलास कोडग यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुले आणि नयन हे धनकवडीतील आंबेगाव पठार परिसरात राहायला आहेत. दोन दिवसांपूर्वी त्यांच्यात एकमेकांकडे बघण्यावरून वाद झाला होता. सोमवारी (४ मे) रात्री सव्वानऊच्या सुमारास नयन आंबेगाव पठार येथील निलगिरी चौकात थांबला होता. त्यावेळी अल्पवयीनांनी त्याला शिवीगाळ केली. त्याच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घातला. त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. गंभीर जखमी झालेल्या नयनला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पसार झालेल्या अल्पवयीनांना ताब्यत घेण्यात आले असून, पोलिस निरीक्षक कोडग तपास करत आहेत.

# नगरपालिका, महापालिकेत समाविष्ट गावठाणांना मिळणार प्रॉपर्टी कार्ड !

## सातबारा बंद करण्याचे महसूलमंत्री बावनकुळेंचे निर्देश







जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील ज्या नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये हद्दवाढीमुळे नवीन गावांचा समावेश झाला आहे, अशा भागातील जमिनींचे ७/१२ (सातबारा) उतारे आता बंद करण्यात येणार असून, या क्षेत्रातील रहिवाशांना त्यांच्या जमिनीचे 'प्रॉपर्टी कार्ड' (मालमत्ता पत्रक) तयार करून देण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे शहरी भागात समाविष्ट झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. जेव्हा एखादे गाव किंवा ग्रामीण भाग महापालिका किंवा नगरपालिकेच्या हद्दीत येतो, तेव्हा त्या जागेचे स्वरूप शेतीकडून अकृषक (एनए) किंवा नागरी वस्तीकडे वळते. अशा वेळी ७/१२ उतारा बंद करून त्याऐवजी 'प्रॉपर्टी कार्ड' असणे कायदेशीरदृष्ट्या अधिक सुलभ असते, असे ते म्हणाले. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारकडून आदेश काढण्यात येणार आहे.

### काय होणार फायदे

– मालमत्तेचे हस्तांतरण करणे सोपे होईल.

– बँकांकडून कर्ज मिळवताना येणाऱ्या अडचणी दूर होतील.

– जमिनीच्या नोंदींमध्ये सुसूत्रता येईल.

# अपघातानंतर मदतीचा बहाणा करुन तरुणीची सोनसाखळी लांबविली

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : अपघातानंतर उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याचा बहाणा करुन तरुणीच्या गळ्यातील सोनसाखळी चोरट्यांनी लांबविल्याची घटना खराडी परिसरात घडली. या प्रकरणी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत एका तरुणीने खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार २२ वर्षीय तरुणी वाघोलीतील केसनंद फाटा परिसरात राहायला आहे. मंगळवारी (५ मे) सकाळी नऊच्या सुमारास तक्रारदार तरुणी आणि तिची आई दुचाकीवरुन खराडी परिसरातून निघाल्या होती. खराडी परिसरात दुचाकी घसरल्याने दुचाकीस्वार तरुणी आणि तिच्या आईला दुखापत झाली. त्या वेळी तेथून निघालेल्या एका चोरट्याने तरुणी आणि तिच्या आईला मदत करण्याचा बहाणा केला. प्रथमोपचार करण्यासाठी खराडीतील एका खासगी रुग्णालयात दाखल करतो, असे चोरट्याने सांगितले. चोरट्याने एक रिक्षा थांबविली. रिक्षाचालकाला एका खासगी रुग्णालयात रिक्षा नेण्यास सांगितले. चोरटा तरुणी आणि तिच्या आईसोबत रिक्षात होता. तरुणीचे लक्ष नसल्याची संधी साधून त्याने तिच्या गळ्यातील ३० हजारांची सोनसाखळी लांबविली.

# भाजपनं भाकरी फिरवली

## महाराष्ट्रात नवीन जबाबदाऱ्या निश्चित

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : येत्या काळात पक्षाचे समन्वय आणि विविध कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नव्या पदाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी याबाबतचे पत्र प्रसिद्ध केले आहे.

या नियुक्त्यांमध्ये मुंबई, ठाणे–कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ अशा सहा विभागांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक विभागासाठी समन्वयक, संयोजक आणि सहसंयोजक नेमण्यात आले असून संघटन विस्तार आणि पक्ष बळकटीकरणावर विशेष भर देण्यात येणार आहे.

मुंबई विभागासाठी राजेश पांडे यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ठाणे–कोकण विभागात योगेश सागर यांच्यावर समन्वयकाची जबाबदारी सोपवण्यात आली असून प्रमोद जठार संयोजक तर संजय वाघुळे सहसंयोजक असतील. पश्चिम महाराष्ट्रात निरंजन डावखरे यांच्याकडे समन्वयकपद, तर विक्रम पावसकर संयोजक आणि विक्रम देशमुख सहसंयोजक म्हणून काम पाहतील.

उत्तर महाराष्ट्र विभागासाठी माधवी नाईक यांची समन्वयक म्हणून नियुक्ती झाली असून विजय चौधरी संयोजक आणि मंगेश चव्हाण सहसंयोजक असतील. मराठवाडा विभागात सुनील राणे समन्वयक, नितीन काळे संयोजक आणि राहुल लोणीकर सहसंयोजक असतील. तर विदर्भ विभागात संजय कुटे यांच्याकडे समन्वयकपद, दिनेश सूर्यवंशी संयोजक आणि प्रविण दटके सहसंयोजक म्हणून जबाबदारी पार पाडतील. ही नियुक्ती तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने संघटन मजबूत करण्यासाठी हे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे. पक्षाच्या राज्यस्तरीय नेतृत्वाने या निर्णयाला महत्त्व दिले असून कार्यकर्त्यांमध्येही यामुळे उत्साहाचे वातावरण आहे.

# भीमाशंकर मंदिर ३१ मे रोजी पुन्हा खुले होणार

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : मुख्य सभामंडपाच्या पुनर्बांधणीसह विविध सुरक्षा व सुविधा विकासकामे करण्यासाठी बंद असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर ३१ मे रोजी भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे. ही कामे पूर्णत्वाच्या टप्प्यात आहेत. त्यामुळे गेल्या साडेतीन महिन्यापासून बंद असलेल्या मंदिरात भाविकांना आता सुलभ दर्शन घेता येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार मंदिर परिसरातील गर्दी व्यवस्थापन आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी ही कामे हाती घेण्यात आली होती. सुरुवातीला ९ जानेवारीपासून तीन महिने बंद ठेवण्याचे नियोजन होते, मात्र कामांच्या प्रगतीनुसार ही मुदत ३१ मे पर्यंत वाढवण्यात आली. नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या वाढत्या संख्येला अनुरूप सुविधा उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश होता. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून २८८.१७ कोटी रुपयांचा निधीच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली.

# अयोध्या ते मुंबई अन् वाराणसी ते पुणे अमृत भारत एक्सप्रेस : प्रवाशांना दिलासा



जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे: भारतीय रेल्वेने दोन नवीन अमृत भारत एक्सप्रेस सुरु केल्या आहेत. या दोन्ही अमृत भारत एक्सप्रेस मुंबई पुण्यावरुन सुटणार आहेत. २८ एप्रिलला या वंदे भारत एक्सप्रेसची सुरुवात झाली आहे. या दोन्ही वंदे भारत एक्सप्रेसमुळे प्रवाशांना खूप फायदा होणार आहे. या एक्सप्रेस थेट अयोध्या आणि बनारसला जाणार आहे. त्यामुळे मुंबई पुण्याहून तुम्हाला तीर्थक्षेत्राला भेट देता येणार आहे.

एक अमृत भारत एक्सप्रेस बनारस ते पुणे हडपसर धावणार आहे तर दुसरी अमृत भारत एक्सप्रेस अयोध्या ते मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस येथे धावणार आहे. यामुळे भाविकांना खूप फायदा होणार आहे. रेल्वे मंत्रालयाच्या माहितीनुसार, या अमृत भारत एक्सप्रेसमुळे काशी विश्वनाथ धाम आणि श्री राम मंदिर अयोध्या यामध्ये कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. यामुळे महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश ही दोन राज्ये जोडली जाणार आहेत. त्यामुळे ही ट्रेन भाविकांसाठी खूप महत्त्वाची ठरणार आहे.

वाराणसी ते हडपसर अमृत भारत एक्सप्रेसचा नंबर ०२५३१ असणार आहे. ही ट्रेन बनारसमधून संध्याकाळी निघणार आहे. त्यानंतर मध्यरात्री पुण्यातील हडपसरला पोहचेल.

वाराणसी ते हडपसर वंदे भारत एक्सप्रेस ज्ञानपुर रोड, प्रयागराज, फतेहपुर, गोविंदपुरी, ओरई, विरांगणा लक्ष्मीबाई झासी, रानी कमलापति, नर्मदापुरम, इटारसी, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर, दौंड आणि हडपसर अशा एकूण १८ स्थानकांवर थांबणार आहे.

अयोध्या ते मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा प्रवास २८ तासात पूर्ण होणार आहे. ही ट्रेन १२ स्थानकांवर थांबणार आहे. यामध्ये अयोध्या, सुल्तानपुर, एमबीडी प्रतापगड, प्रयागराज जंक्शन, सतना, जबलपुर, इटारसी जंक्शन, भुसावळ, जळगाव, नाशिक रोड, कल्याण, ठाणे त्यानंतर लोकमान्य टिळक टर्मिनसला पोहचणार आहे. या ट्रेनमुळे प्रवाशांना खूप फायदा होणार आहे.

# सराईत गुन्हेगाराकडून गावठी पिस्टल जप्त

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : फुरसुंगी येथील गंगानगर भागात फिरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखेच्या युनिट ६ च्या पथकाने पकडून त्याच्याकडून एक गावठी पिस्टल व २ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

साहिल शाम नरळकर (वय २५, रा. चक्रपाणी वसाहत, मंगलमुर्ती हौसिंग सोसायटी, भोसरी) असे या गुन्हेगाराचे नाव आहे. गुन्हे शाखेच्या युनिट ६ चे पथक ५ मे रोजी पूर्व भागात समांतर रात्रगस्त पेट्रोलिंग करत होते. बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, साहिल नरळकर हा फुरसुंगीतील गंगानगर भागात फिरत असून त्याच्याकडे गावठी पिस्टल आहे. या खात्रीशीर माहितीवरुन पोलिसांनी शोध घेऊन साहिल नरळकर याला पकडले.

# अग्रलेख : सर्वत्र स्वैराचाराचा हाह:कार; शिक्षेत गतीमानता हवी

खरात प्रकरणाची राळ खाली बसत नाही तोच नाशिकमधील कॉर्पोरेट कंपनीतील धर्मांतराच्या नावे तरुणींचे वासनाकांड प्रकरण उघड झाले. पाठोपाठ गोरेगावातील ड्रग्ज प्रकरण. अमरावती परतवाडा, कोल्हापूरमध्येही याच पद्धतीने तरुणींना सोशल मिडियाद्वारे ब्लॅकमेल करीत अत्याचाराची प्रकरणे चव्हाट्यावर आली. नसरापूर असो वा अन्य चाकण, पुण्यासह रोज राज्यभरात व्यभीचार, अल्पवयीनांचे अत्याचार आणि खुनाचे प्रकार सुरूच आहेत. पोलिस यंत्रणा आपल्यापरीने काम करीत आहेच. पण बिघडती सामाजिक परिस्थिती आणि नातेसंबंधांनाही तिलांजली देत लिंगपिसाटांचा सुळसुळाट पाहता एकूणच आबाल वृद्धा ना बाहेर ना घरात सुरक्षित नाहीत. सर्वत्र स्वैराचाराचा जणू हाह:कार सुरू असल्याचे चित्र आहे. याला रोख घालायचा कसा हा प्रश्न आवासून उभा आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून महाराष्ट्रात बऱ्याच चमत्कारिक घटना, दुर्घटना घडत आहेत. तंत्र-मंत्रांच्या अद्भुत कहाण्या कानावर येत आहेत. पुरोगामी महाराष्ट्राच्या लौकीकाला बट्टा लागेल, अशा या घटनांचा समाचार घेताना कुठून सुरुवात करावी हेच कळेनासे झाले आहे. मन विषण्ण करणाऱ्या, अचंबित करणाऱ्या वेगवेगळ्या घटना रोज घडत आहेत. गुन्हेगारी व मुजोरीला वेसण घालण्यात आपली यंत्रणा कुचकामी ठरत आहे. तरुण पिढी ड्रग्जच्या नादी लागली आहे. तरुण पिढीतील क्षमतांचा नाश करणारे हे ड्रग्ज परदेशातून बेमालूमपणे येत आहे. ड्रग्जचा वापर अगदी मध्यमवर्गीयांच्या घरापर्यंत येऊन पोहोचला आहे. कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज पकडले जातात. परंतु त्याचा उगम आणि वापर काही थांबत नाही. उलटपक्षी जेवढे ड्रग्ज पकडले जातात त्याच्या दसपट विकले जातात आणि सेवन केले जातात. गोरेगावसारख्या मध्यमवर्गीयांच्या व समाजवादी चळवळीच्या नेत्यांचे संस्कार असलेल्या परिसरात ड्रग्जचे सेवन करून तरुणाई बेशुद्ध पडते, अर्धनग्न नृत्य करते हे धक्कादायक आहे. काही वर्षांपूर्वीची एका खेड्यातील घटना. दुपारची जेवणाची सुट्टी झाली. त्यापैकी २५-३० मुले सामुदायिकपणे एका टेकडीवर गेले. शिक्षकांनी जेव्हा त्यांना पकडले तेव्हा त्यांच्याकडे ड्रग्ज मिळून आले. ही खेडेगावातील परिस्थिती, मग शहरात तर आनंदी आनंद.

अशोक खरातसारख्या भोंदूबाबाच्या लीलांनी नाशिककरांसह महाराष्ट्रातील समाजमन हादरलेले असताना एका कॉर्पोरेट कंपनीतील तरुणींना धर्मांतर करण्यास भाग पाडले जात असल्याच्या घटना नाशिकमध्ये घडत होत्या हे धक्कादायक आहे. पुण्यनगरी म्हणून ओळखले जाणारे नाशिक अशा घटनांकरिता ओळखले जावे यापेक्षा दुर्दैव ते कोणते? महिला अत्याचारापासून धर्मांतरापर्यंत नानाविध गुन्हे बोकाळले आहेत. बाप मुलीवर बलात्कार करतो, चार वर्षाच्या चिमुरडीवर वृद्ध अत्याचार करून ठार मारतो, आजोबा आठ-नऊ वर्षाच्या नातीवर अत्याचार करतो हे किळसवाणे प्रकार एकूणच सर्वत्र नराधमांचा सुळसुळाट सुरू असल्याचे चित्र आहे. वास्तविक या व अशा सर्व महत्त्वाच्या घटनांमध्ये एसआयटी चौकशी सुरू आहे. महाराष्ट्रात आता एक स्पेशल फोर्स व एसआयटीसाठी नवे पोलीस आयुक्तालय तयार करावे लागणार आहे की काय, अशी शंका वाटते.

नाशिकनंतर अमरावतीजवळील परतवाडा या मेळघाट विभागात धर्मांतराचे प्रकार उघडकीस आले. हे इतके भयानक आहे की, विचार करण्याची शक्ती संपली आहे असे वाटते! अचलपूर-परतवाडा भागात ८० मुलींचे लैंगिक शोषण व ३०० च्या वर व्हिडीओ, फोटो समोर आले आहेत. या सर्व प्रकारात विशिष्ट समाजाची मंडळी असल्याने त्याला धार्मिक स्वरूप प्राप्त होत आहे.

हे लोण अगदी पुरोगामी पश्चिम महाराष्ट्र अर्थातच कोल्हापूरस-ारख्या ठिकाणीही पोहोचले हे दुर्दैव. पुलाची शिरोली भागात एका तरुणाने तब्बल २० हून अधिक मुलींना अशाच पद्धतीने प्रेमाच्या जाळ्यात ओढून, अश्लिल चित्रफितीसह विविध कारणांनी धमक्या देत वासनेची शिकार बनविल्याचा प्रकार चव्हाट्यावर आला. याप्रकरणी बापाने चक्क या मुलाच्या कृत्याची माफी मागत त्याला फासावर लटकवावे, अशी मागणी केली आहे. पुण्याजवळील नसरापूरमध्ये तर अवघ्या चार वर्षाच्या बालिकेला गुन्हेगार वृद्धाने वासनेची शिकार बनवत गळ्याला नख लावले. दररोज असे प्रकार सुरूच आहेत. एकूणच हे पाहता वासनांधतेचा नंगानाच सुरू असून, यंत्रणा ती रोखण्यास कमी पडते की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

वास्तविक महिला अत्याचार रोखण्याकरिता कडक कायदे आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. न्यायासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते. दिल्लीतील सायबा केस आठ वर्षं चालली. तोपर्यंत आरोपीचा मृत्यू झाला. शिवानी खटला किती वर्षं सुरू आहे? घटना उघड होते तेव्हा सनसनाटी निर्माण होते. परंतु ती टिकत नाही. सर्वत्रच तारीख पे तारीख!! खरात प्रकरण असो की धर्मांतराचे प्रकरण, की गोरेगावातील ड्रग्जचे प्रकरण की असो अमरावतीच्या परतवाड्यातील न्यायालयात निकाल. तो झटपट लागून आरोपीला शिक्षा झाली पाहिजे. आता वासनांध गुन्हेगारांना 'पॅरोल' मिळू नये असा मंत्रिमंडळाने निर्णय घेत विधी व कायदा विभागाला कळविले आहे. तसाच न्यायही फास्टट्रॅकवर आणि गतीमान कठोर व्हायला हवा. अशा प्रकरणांमध्ये झटपट न्याय झाला हे जनतेला जाणवले पाहिजे. अन्यथा केवळ सनसनाटी निर्माण होण्यापलीकडे काही घडणार नाही. तसे होणे अयोग्य आहे.

# 'थलपती'चा नकार; आई-वडिलांविरोधात खटला

## राजकारण

### राजकारणासाठी आग्रह केल्याने सहा वर्षांपूर्वी 'विजय'चा पवित्रा



अभिनय क्षेत्रातून राजकारणात प्रवेश करणाऱ्या सुपरस्टार थलपती विजय याने तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) या पक्षाच्या माध्यमातून तमिळनाडूची सत्ता काबिज केली. सर्वात मोठा पक्ष ठरला असून, तो तो लवकरच मुख्यमंत्री होणार आहे. परंतु सहा वर्षांपूर्वी त्याने राजकारण गलिच्छ म्हणत त्यात जाण्यास नकार दिला होता. त्याला जबरदस्तीने राजकारणात पाठवणाऱ्या स्वतःच्याच आई- वडिलांविरोधात त्याने खटला दाखल केला होता खटला, ही आश्चर्याची बाब आहे.

अभिनय क्षेत्रातून राजकारणात प्रवेश करणाऱ्या थलपती विजय यांचा तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) हा तमिळनाडूतील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. विजय यांना मिळालेल्या यशाने राजकीय वर्तुळात अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. विजय यांच्या टीव्हीके पक्षाने तमिळनाडूतील सर्वच २३४ जागांवर उमेदवार दिले होते. त्यापैकी १०८ जागांवर टीव्हीकेला विजय मिळाला आहे. तमिळनाडूच्या राजकारणात विजय 'गेम चेंजर' ठरले. दाक्षिणात्य चित्रपट सृष्टीतील आघाडीला असलेल्या अभिनेत्यांपैकी विजय एक आहेत. तमिळनाडूत त्यांच्या फॅन व समर्थकांची संख्या लक्षणीय आहे. प्रचारात एकदा विजय म्हणाले होते, सर्वच २३४ जागांवर विजयच उमेदवार आहे.

तमिळनाडूच्या राजकारणात विजय यांना यश मिळाले आहे. राजकारणात प्रवेश करण्याआधी विजय यांनी अनेक अडथळ्यांचा सामना केला आहे. सहा वर्षांपूर्वी विजय यांच्या पालकांनी त्यांना राजकीय क्षेत्रात पाठवण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा विजय यांनी आई - वडिलांविरोधात खटला दाखल केला होता. परंतु, २०२४ मध्ये थलपती विजय यांनी त्यांच्या पक्षाची घोषणा केली.

**थलपती विजय यांना कोणती भीती?**

सन २०२३ मध्ये थलपती विजय पक्ष स्थापन करणार असल्याची अफवा असताना सिनेक्षेत्रातील एका सूत्राने 'द इंडियन एक्स्प्रेस'ला सांगितले, विजय यांच्या फॅन ग्रुपची स्थापना झाल्यानंतर त्यांच्या वडिलांनी विजय यांच्या राजकीय पदार्पणाची तयारी केली होती. परंतु, विजय यांच्या मनात त्यावेळी राजकारणातील करिअर बाबत शंका व अनिश्चितता होती. तमिळनाडूच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण होत नाही, तोपर्यंत राजकारणात जाण्याचा विचार नाही, असे ते आम्हाला खासगीत म्हणाले होते. आता मध्ये ते स्थानिक पातळीवर काम करत आहेत. मुख्यमंत्री एमके स्टॅलिन व एआयएडीएमकेचे नेते एडापद्दी के पलानीस्वामी यांचे वर्चस्व असलेल्या राजकारणात प्रवेश करण्याची त्यांची ही सुरूवात असावी. असे २०२३ मध्ये एका सूत्राने सांगितले होते.

### विजय यांच्या नावाने फॅनक्लब्ज, समाजसेवा

दाक्षिणात्य अभिनेता विजय यांच्या चाहत्यांनी शहरी तसेच ग्रामीण भागात फॅन क्लब्ज सुरू केले. त्याअंतर्गत कार्यालये (ऑफिसेस) सुरू करण्यात आली. चाहत्यांकडून विजय यांच्या नावाने समाजकार्य होत होते. रक्तदान शिबीरे आयोजित केली जात होती. 'ऑल इंडिया थलपती विजय मक्कल इयाखखम' या नावाखाली विजयचे चाहते काम करत होते. थलपती विजय यांनी चाहत्यांकडून मिळत असलेल्या या समर्थनाचे रूपांतर राजकीय फायद्यात करणे ही एक सामान्य बाब होती. कारण तमिळनाडूत या आधी अनेक अभिनेत्यांनी याच प्रकारे राजकारणात प्रवेश केला होता. परंतु, थलपती विजय यांच्या मनात राजकारणात प्रवेश करण्याबाबत साशंकता होती.

**आई - वडिलांवर दाखल केला होता खटला**

तमिळनाडूत थलपती विजय यांची प्रतिमा एका लाजाळू आणि खासगी जीवन जगणाऱ्या अभिनेत्याची आहे. ते जनतेशी मर्यादीत संवाद साधतात. विजय यांच्या राजकीय प्रवेशात त्यांचे वडील एस ए चंद्रशेखर यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सन २०२० मध्ये एस. ए. चंद्रशेखर यांनी विजय यांच्या विजय मक्कल इयाख्खम (व्हीएमआय) या संस्थेची राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी विजयची परवानगी घेतली नव्हती. त्यांनी स्वत:चे नाव पक्षाचे सरचिटणीस, तर त्यांच्या पत्नी व विजय यांच्या आई गायिका शोभा यांचे नाव पक्षाच्या कोषाध्यक्षा म्हणून दिले होते. पक्ष स्थापन करणे ही माझी भूमिका होती, त्याच्याशी विजयचा काहीही संबंध नव्हता, असे थलपती विजय यांचे वडील म्हणाले होते. तर राजकारणात कधी उतरायचे याबाबत विजयच निर्णय घेईल, असे विजयच्या आई म्हणाल्या होत्या. सप्टेंबर २०२१ मध्ये विजयने व्हीएमआय व त्याच्या पालकांसह इतर ११ जणांविरोधात खटला दाखल केला होता. त्यानंतर व्हीएमआय पक्ष विसर्जित केला होता.

## अंतरंग

### ममता पर्वाचा अस्त

सर्व देशाचे लक्ष पश्चिम बंगालमधे झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाकडे होते. स्ट्रीट फायटर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ममता बॅनर्जींच्या सत्तेला भाजपाने सुरूंग लावला. सलग पंधरा वर्षे मुख्यमंत्री असलेल्या ममता यांचा दारूण पराभव त्यांच्याच पूर्वीच्या निकटवर्तीय सहकारी असलेल्या सुवेंधू अधिकारी या भाजपाच्या उमेदवाराने केला. पश्चिम बंगालमधे कमळ फुलले म्हणून भाजपाने देशभर मिठाई नि जिलेबी वाटून व फटाक्यांच्या माळा लावून विजयोत्सव साजरा केला. देशात गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत भाजपाचे कमळ फुलले असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पक्षाच्या मुख्यालयात अभिमानाने सांगितले. मोदी- शहा आणि भाजपाला सतत आव्हान देणाऱ्या ममता दीदींचा पराभव झाल्याने भाजपाचा एक मोठा विरोधक दूर झाला आहे, ममता यांच्या पराभवाने भाजपाविरोधी इंडिया आघाडीतील ताकदवान बुरूज ढासळला आहे. भाजपाच्या महाप्रंचड ताकदीपुढे व जबरदस्त नियोजनापुढे ममता व त्यांच्या पक्षाचा निभाव लागला नाही. निवडणूक आयोगाने मतदार याद्या सुधारणा करताना ९१ लाख मतदार वगळले होते.२७ लाख मतदारांना अपात्र ठरवले. प्रशासन व पो-लीस दलातील पाचशेहून अधिकाऱ्यांमधे फेरबदल करण्यात आले होते. इडी व निवडणूक आयोगासारख्या यंत्रणा अहोरात्र कार्यरत होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेप्रत्येक बारीक सारीक गोष्टीवर लक्ष ठेऊन होते.

बांगला देशच्या सरहद्दीवर कुंपण घालण्यासाठी जागा संपादन करून बीएसएफ कडे द्या या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाकडे ममता यांनी दुर्लक्ष केलेच पण त्यासाठी राज्याला आर्थिक दंड सोसावा लागला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या राज्यात आल्या असताना, त्यांच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री म्हणून ममता गैरहजर राहिल्याच पण त्यांचे स्वागत करायला विमानतळावरही गेल्या नव्हत्या. पंतप्रधानांनी निमंत्रित केलेल्या ऑन लाईन बैठकीलाही मुख्यमंत्री म्हणून उपस्थित राहण्याचे त्यांनी सौजन्य दाखवले नाही. पंतप्रधान राज्यात आले असताना राजशिष्टाचार म्हणून त्यांच्या स्वागतालाममता स्वत: गेल्या नाहीत तर त्यांनी एका मंत्र्याला पाठवले. राज्यात एसआयआर कार्यक्रम राबवला जात असताना त्यांनी अनेकदा अडथळे आणले. तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केंद्रीय निवडणूक अधिकाऱ्यांना कित्येक तास ओलीस ठेवले होते, तेव्हा त्या मूकपणे सर्व पाहात राहिल्या. लोकसभेत महिला आरक्षण विधेयकाला कडाडून विरोध करून ते हाणून पाडण्यात तृणमूल काँग्रेस पक्ष आघाडीवर होता. गेल्या दहा वर्षात ममता आणि मोदी सरकार यांच्यात दरी वाढली होती. ममता यांच्या दृष्टीने भाजपा हा त्यांचा एक नंबरचा राजकीय शत्रू होता. भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या भूमीत भाजपाला गेल्या बारा वर्षात पाय रोवता आले नव्हते ही मोदी- शहांची मोठी खंत होती म्हणूनच सर्व आघाड्यांवर जोर लावून भाजपाने निवडणूक लढवली व तृणमूल काँग्रेसच्या पंधरा वर्षाच्या गडाला सुरूंग लावला.

ममता यांच्या पंधरा वर्षाच्या सरकारला अँटी-इनकमबन्सीचा सर्वात मोठा फटका बसला.२०२१ मधे तृणूल काँग्रसने राज्यातील सर्व २९४ विधानसभा मतदारसंघात उमेदवार उतरवले होते.पक्षाचा प्रत्येक उमेदवार म्हणजे मीच आहे असे समजून मतदान करा, असे तेव्हा ममता यांनी आवाहन केले होते. गेल्या निवडणुकीत मोदी- शहांनी ओ दीदी किंवा ए ममता अशा शब्दात टीका केल्याने ममता संतापल्या होत्या. त्यांनी बंगालमधे येऊन महिलेचा अवमान केला असे ममता यांनी भांडवल केले होते. बंगालचा विकास व महिलांची सुरक्षा यावर भाजपाने प्रचारात भर दिल्यामुळे यावेळी मोठ्या प्रमाणावर मतदान भाजपाला झाले , हेच निकालानंतर स्पष्ट झाले. राज्यात वाढलेली मुस्लिमांची लोकसंख्या, बांगला देशातून सतत होणारी घुसखोरी यामुळे बंगाली लोक त्रस्त झाले आहेत. बांगला देशात हिंदुंवर अत्याचार होतात,त्यांना तिथे राहणे मुष्किल करतात, तेथील मंदिरांवर सतत हल्ले होतात म्हणून राज्यातील हिंदु जनतेत संताप आहे. राज्यात भाजपाची सत्ता आली तर सडेतोड उत्तर दिले जाईल याच भावनेतून हिंदु व्होट बँक भाजपाच्या पाठिशी उभी राहिली. प्रत्येक निवडणुकीत मुस्लिम मतदार तृणमूल काँग्रेसला एक गठ्ठा मतदान करीत होता.पूर्वी मुस्लिम मतदार हे कम्युनिस्टांना मते देत असत, नंतर तो तृमणूलकडे सरकला. आता हाच मतदार काँग्रेसकडे वळला असल्याचे दिसून आले. पंचवीस हजार शिक्षक भरती घोटाळ्यातील भ्रष्टाचारावर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे मारले, राज्याची देशभर बदनामी झाली राज्यात भाजपा सत्तेवर आली तर लोकांना मासे, मांस , अंडी खायला मिळणार नाही, असा ममता यांनी प्रचार केला. त्याला उत्तर म्हूणून भाजपाच्या नेत्यांनी मासे व भात खाण्याचे प्रदर्शन केले. ममता यांचा पराभव झाल्यावर भाजपाच्या कार्यकर्त्यांना मासे भाताचे जेवण दिले गेले. ममता या कॉलेज विद्यार्थी असतानापासून युवक काँग्रेसची लढाऊ कार्यकर्ता म्हणून रस्त्यावर आंदोलन करीत. आणिबाणी उठल्यानंतर लोकनायक जयप्रकाश नारायण हे कोलकता येथे आले तेव्हा त्यांची गाडी अडवून ममताने घोषणा दिल्या होत्या. १९८४ मधे मार्क्सवादी पक्षाचे दिग्गज नेते सोमनाथ चटर्जी यांचा जाधवपूर लोकसभा मतदारसंघात पराभव करून जाएंट किलर म्हणून सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले होते. वाजपेयी यांच्या एनडीए सरकारमधे त्या दोन वेळा केंद्रात मंत्री होत्या. स्वत: वाजपेयी कोलकता येथे आले असताना यांच्या घरी जाऊन ममता यांच्या आईला भेटले होते. बंगालमधे डाव्यांशी लढताना व मुस्लिम व्होट बँक संभाळताना अडचण नको म्हणून त्यांनी नंतर भाजपाशी साथ सोडली. २०११ मधे बंगालमधील ३४ वर्षांची डाव्यांची सत्ता त्यांनी उलथवून टाकून इतिहास घडवला व तेव्हापासून त्या मुख्यमंत्री झाल्या. ममता यांनी तीस वर्षापूर्वी भाजपाला कोलकत्यात प्रवेश मिळवून दिला, त्याच भाजपाने त्यांची सत्ता २०२६ मधे उलथवून टाकली.

– डॉ. सुकृत खांडेकर

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ वैशाख शके संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- वैशाख
ऋतु- सौर ग्रीष्म कृष्ण पक्ष तिथि : पंचमी १०:१४:१३
नक्षत्र : पूर्वाषाढा १८:४५:३१ योग : साध्य २५:५८:५२+
करण : तैतिल १०:१४:१३ करण : गर २३:२०:४१ सूर्य : मेष
चन्द्र : धनु हिजरी सन् - १४४५ मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - २० विशेष संत चोखमेळा पुण्यतिथी

## राशी भविष्य...

**मेष** – आर्थिक लाभ होईल. आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. आरोग्याची काळजी घ्या. घरात सुख-शांती, व आनंद राहील.

**वृषभ** – नवीन कार्य हाती घ्याल, बिघडलेले संबंध चांगले होवून प्रसन्नता वाटेल. अभ्यासाची आवड लागेल. तोंडावर नियंत्रण ठेवा. कामकाजात वाढ होईल, परंतु कामाचे योग्य फळ पदरात पडेल.

**मिथून** – मन लावून काम केल्यास धंद्यात वाढ होईल. घाईगडबडीने कामे करू नका. कौटुंबिक परिवाराच्या सहकार्याने समाधान मिळेल. धनलाभ होण्याची शक्यता.

**कर्क** – मित्रांच्या सहकार्यामुळे मनोधैर्य वाढेल. प्रसन्नता वाटेल, आर्थिक लाभाची शक्यता महत्वाच्या कामांसाठी खर्च होईल. दुसऱ्यांवर विसंबून राहू नका.

**सिंह** – पूर्वी केलेल्या कामाचे फळ मिळेल. लाभ, मान-सन्मानामध्ये वाढ होईल. मनोरंजनाची वेळ येईल. धंद्यात वाढ होईल. खाण्यापिण्यावर लक्ष ठेवा.

**कन्या** – आज आपल्या मनातील इच्छेनुसार कामे पूर्ण होतील. आपले विरोधक ही आपल्या कामाची प्रशंसा करतील. खर्च वाढवू नका. मन लावून काम केल्यास आपल्या कामात वाढ होईल.

**तूळ** – धंद्यात वाद-विवाद होऊ शकतात. कामकाजात व्यत्यय येईल. आवक पेक्षा जावक जास्त असल्याने परेशानी होईल. कौटुंबिक परिवारातील सदस्यांची चिंता वाटेल.

**वृश्चिक** – मनोबल वाढेल. धंद्यात वाढ व सुख-समृध्दी मिळेल. परिवारात केलेल्या कामावर चर्चा होईल. खर्चावर नियंत्रण ठेवा. मोठ्यांचा मान ठेवाल.

**धनू** – योजना पूर्ण झाल्याशिवाय काम हाती घेऊ नका. दुसऱ्याच्या विश्वासावर स्वत:चा काम करावे लागेल. आर्थिक अडचणी, कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर** – व्यक्तिगत जीवनातील चिंता दूर होतील. व्यवसायात वाढ होऊन आनंद मिळेल. वाहन हळू चालवा. कष्टाला यश मिळेल. कामातील अडचणी दूर होण्याचे योग आहेत.

**कुंभ** – आर्थिक परिस्थिती चांगली राहील. सामाजिक कार्यात व्यापून जाल, धंद्यात नवीन योजना हाती घ्याल, मुलांच्या रोजगाराची चिंता राहील. उद्योग-धंद्यात निष्काळजीपणा, उतावळेपणा करू नका.

**मीन** – सामाजिक कार्यात मग्न रहाल. वाहन सुख मिळेल. वेळेचा उपयोग होईल. नोकरीमध्ये केलेल्या कामाची किंमत, महत्त्व वाढेल. जबाबदारीचे काम टाळा.

## पारावरचा फड

सध्याच्या एकूणच सत्तापिपासू राजकारणात विरोधकांचा टिकाव लागणं मुश्किल झालं आहे. कारण केंद्रात, राज्यात असो वा स्थानिक पातळीवर सर्वत्रच सत्ताधारी पक्षाचा बोलबाला तर दुसरीकडे विरोधकांची गळचेपी हेच धोरण असल्याचे दिसून येतं. त्यात जर टिकाव लागायचा असेल तर 'खुलेआम पलटूराम' हे धोरण आता उघड आहे. त्यातल्या त्यात लोकसभा निवडणुकीनंतर विरोधकांना 'अच्छे दिन'ची आशा होती, ती राज्यातील विधानसभा निवडणुकीत फोल ठरली होतीच. स्थानिक स्वराज्य संस्थेतही महायुतीचाच बोलबाला झाल्याने आता सर्वजण सत्ता तिकडं चांगभलं म्हणू लागलेत. त्यातही पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या निवडणुकीनंतर वातावरण बदलेल अशा आशा भाजपने '२४ बाय ७' राजकारण धोरणाने ते फोल ठरविलेय. परिणामी काँग्रेस, उद्धव ठाकरे सेना अन् शरद पवार राष्ट्रवादीला आता 'फड सांभाळ तुऱ्याला गं आला, तुझ्या उसाला लागंल कोल्हा' म्हणण्याची वेळ आलीय. यासंदर्भात पारावरची चर्चा !

**पांडूनाना :** आरं भाजपच्या '२४ तास मिशन इलेक्शन'म्होरं समदी ढेर व्हाय लागल्याती.

**पांडूनाना :** व्हय, त्येंचं मायकरोप्लॅनिंग आन् पक्शाचं झोकून देऊन काम न्हाय म्हटलं तर कवतीकाचं हाय.

**बाबूराव :** आरं कारपोरेट झाल्याती समदी. हिकडं मातुर इरोदक आजून समदं ग्रुहीत धरूनच चालल्याती.

**पांडूनाना :** म्हनून तर समदीकडं भाजप आन् त्येंचं साथीदार आता मजबूत हुत्याती.

**बाबूराव :** त्यातल्या त्यात सत्तंसाठी समदं रस्त आवलंबत्याती. इरोदकास्नी ठेवतच न्हायती.

**पांडूनाना :** व्हय, त्येंचं इनकमिंग कायमचं सुरु हाय.

**बाबूराव :** आन् हिकडं कांगरेस, उद्धोसेनेचं नेतं कुनास्नी भेटत बी न्हायती. आपल्या मसतीत मशगुल.

**पांडूनाना :** म्हनून तर आता उरलं सुरलं खासदार, आमदार आन् नेतं समदीच भाजप, शिंदेशेना आन् आजितदादा राष्ट्रवादीकडं पळाय लागल्याती. म्या तर म्हंतुया म्होरच्या इलेक्शानपातुर कोन ऱ्हाईल का नाय.

**बाबूराव :** आता बग न्हवं, उद्धोसायबाचं आट खासदार शिंदेसायबाच्या संपरकात. आमदार बी भेटत्यात.

**पांडूनाना :** हिकडं दोनी राष्ट्रवादी एक व्हावी म्हंत्यात. कांगरेसवाल्या सातवबाई भाजपकडं गेल्या आन् पुना आमदार झाल्या.

**बाबूराव :** आता बंगालसकट इतर राज्यात बी भाजप बळावली म्हनू समदंच नाउमेद.

**पांडूनाना :** आरं व्हात्या पान्यात हात धुनं हेलाच म्हंत्यात राजकारन. इरोदात कोन कशापाई ऱ्हातंया.

**बाबूराव :** म्हजी पुना इनकमींग हुईल. इरोदक नावाला.

**पांडूनाना :** बगू आनी काय हुतंया? – **अमृत चौगुले**


## उपदेश कथा



**ईश्वराचे अस्तित्व**

ईश्वराने सृष्टीची निर्मिती केली. मानव नावाचा अदभूत प्राणीही निर्माण केला. त्याला तयार करताना मात्र देवाला खूप त्रास झाला. मानवाच्या निर्मितीनंतर हा त्रास वाढू लागला तेव्हा ईश्वराने साऱ्या देवतांना बोलाविले व विचारले, माणसाला तयार करुन मी संकटात सापडलो आहे. मला चोवीस तास हाका ऐकून घ्याव्या लागतात. सारखं वाटते की, माणूस सतत माझ्या दाराजवळ उभा राहून तक्रार करत आहे. त्यामुळे मला शांतपणे झोपही लागत नाही. मी काय करु ? कोठे लपू ? जेथे माणूस येणार नाही अशी जागा सांगा ? या प्रश्नानंतर ईश्वराला त्या साऱ्या देवतांनी अनेक जागा सुचविल्या. पण ईश्वराला वाटले काहीही करुन माणूस तेथे पोहचणारच. म्हणून त्याने त्या सर्व जागा नाकारल्या अखेर एक म्हातारा देव उठला ! त्याने ईश्वराला कानात काहीतरी सांगितले. ईश्वरालाही ते पटले. त्या वृध्द देवाने सांगितले होते की, तू माणसाच्या आत हृदयात लपून बैस. ईश्वराने तसे केले आणि तो सुखी झाला.

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

२००६ - आयसीसीने श्रीलंकेचा कर्णधार महेला जयवर्धने याची कॅप्टन ऑफ द इयर या पुरस्कारासाठी निवड केली.

२००७ - पाकिस्तानमध्ये आणीबाणी जाहीर करण्यात आली.

**राष्ट्रीय**

१६०५ - जहांगीर हे नाव परिधान करून सलीम आग्रा येथे तख्तावर बसला.

१९७१ - बांगलादेशाच्या निर्वासितांच्या मदतीसाठी टपाल तिकिटांवर ५ पैसे जादा आकारणी केली गेली.

२००८ - दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) ने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी अटक करण्यात आलेल्या साध्वी प्रज्ञासिंह विरुध्द न्यायालयात बॉम्बस्फोटानंतर साध्वी आणि अभिनव भारतचा सदस्य रामजी नावाचा व्यक्ती यांच्या झालेल्या चर्चेचा तपशीलाचा एक टेप सादर केला.

### कोकण रेल्वे कोणासाठी?

कोकण रेल्वे सुरू झाल्यापासून तिचा लाभ कोकणातील प्रवाशांऐवजी गोवा, कर्नाटक, केरळ यांच्यासह उत्तरेकडील राज्यांमधील लोकांनाच अधिक होत आहे. या मार्गावरील टर्मिनस, गाड्या, त्यांच्या वेळा, त्यांचे थांबे, गाड्यांची वारंवारीता या सगळ्यांवरच परप्रांतीयांची सोय आधी आणि मग कोकणातल्या प्रवाशांची.... याचाच प्रभाव जाणवतो. आता तर कोकण रेल्वेतील सर्व गाड्यात परप्रांतीय विशेषतः उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, झारखंड या राज्यातील प्रवाशांची घुसखोरी पहायला मिळते. आरक्षित डब्यातही हे परप्रांतीय प्रवासी बिनदिक्कतपणे घुसखोरी करून आरक्षण करणाऱ्या स्थानिक प्रवाशांवर अरेरावी करत त्यांच्याच आरक्षित सीटवर आक्रमण करतात जर कोणी विरोध केला तर थेट गुद्द्यावर येतात. गाडीमधील रेल्वे पोलिस आणि तिकीट चेकरही त्यांच्या या अरेराविला अटकाव करत नाही. महाराष्ट्राच्या कोकण विभागातून निवडून आलेले आमदार खासदारही परप्रांतीय प्रवाशांच्या या अरेरावी विरुध्द ब्र शब्द काढत नाही त्यामुळे कोकण रेल्वे नक्की कोणासाठी कोकण वासियांसाठी की परप्रांतीयांसाठी? असा प्रश्न पडतो. कोकण रेल्वेच्या बाबतीत उदासीनता बाळगणाऱ्या कोकणातील या आमदार, खासदारांना कोकणवासीयांनी मतपेटीतून त्यांची जागा दाखवून द्यावी.

## जन की बात...

### रिल्सची आभासी दुनिया !

सध्याचे युग हे स्मार्ट फोन आणि इंटरनेटचे युग आहे. हातात स्मार्ट फोन नाही असा तरुण आज शोधूनही सापडणार नाही. इंटरनेटचा डाटा पॅकही परवडणारा असल्याने प्रतिदिन २ जीबी मिळणारा डाटा आजचा तरुण कामासाठी कमी आणि मनोरंजनासाठीच अधिक व्यय करताना दिसतो. ऑनलाईन गेम्स खेळण्यासोबतच आजच्या पिढीला वेड लागले आहे ते रिल्स पाहण्याचे. विविध शासकीय योजनांची माहिती देणारे, तांत्रिक युक्त्या शिकवणारे, नवनवीन पदार्थांच्या रेसिपी सांगणारे, फिल्मी जगताची माहिती देणारे,क्रीडा क्षेत्रातील निवडक आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग दाखवणारे, प्रतिष्ठित व्यक्तींच्या खासगी आयुष्यातील घडामोडींची माहिती देणारे, नृत्याचे प्रशिक्षण देणारे, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय स्तरावरील घडामोडी टिपणारे तसेच कुटुंबासह सुट्टी साजरी करण्यास जाण्यासाठी विविध पर्यटन स्थळांची आणि धार्मिक स्थळांची माहिती देणारे, लाखो रिल्स आज सहज उपलब्ध आहेत. यासोबतच चित्रपटातील एखाद्या गाण्यातील हुक स्टेपवर थिरकणारे तरुण तरुणींचे रिल्स, मालिका आणि चित्रपटांतील विनोदी प्रसंगांचे रिल्सही पुष्कळ प्रमाणात उपलब्ध आहेत. खास प्रौढांसाठी तयार करण्यात आलेले रिल्सही आज वयाची कोणतीच अट न बाळगता सहजपणे सर्वांना पाहता येतात. मनोरंजनासाठी तयार करण्यात आलेल्या, विनोदी मसाला असलेल्या, द्विअर्थी संवादांचा भरणा असलेल्या कंटेंट असलेल्या अशा प्रकारच्या रिल्स बनवणाऱ्या युट्युबर्सची संख्याही वाढली आहे. ठराविक सबस्क्राइबर झाल्यावर, रिल्सना ठराविक लाईक्स आणि शेअर्स मिळाल्यावर ते बनवणाऱ्यांना आर्थिक कमाईसुध्दा होत असते. काहींना तर रिल्स बनवण्याचे जणू व्यसनच लागले आहे. शहरासारख्या ठिकाणी रेल्वे स्थानक असो वा बस स्टॅन्ड, भाजी मंडई असो वा शॉपिंग मॉल सर्वत्रच तरुण मुलामुलींची टोळी रिल्स बनवताना कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात दिसून येते.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनी, विवाहित तरुणी विविध गाण्यांवर अंगविक्षेप करत रिल्स बनवतात आणि त्या इंस्टाग्राम आणि युट्युबवर अपलोड करतात. अशा रिल्सवर येणाऱ्या कमेंट्स वाचून या तरुणींच्या आई वडिलांना, जवळच्या जिवाभावाच्या नातेवाईकांना काय वाटत असेल, याचा विचार या तरुणी करणार आहेत का? रिल्स बनवण्याच्या आहारी गेलेला मोठा वर्ग आज समाजात पाहायला मिळतो आहे.

### चर्चेतून घडवावे आपलं आयुष्य

चर्चा...... चर्चा कोणत्याही विषयावर व्हायलाच हवी. कारण चर्चेतून मार्ग निघतो. तसेच जो मार्ग निघतो. तो मार्ग आपलं मार्गदर्शन करणारा ठरतो वा आपलं आयुष्य घडविणारा ठरतो. अलिकडील काळात आत्महत्या होत आहेत. कधी शेतकरी आत्महत्या तर कधी घरगुती वादातून पती पत्नीची आत्महत्या तर कधी गुण कमी मिळाले म्हणून विद्यार्थी वर्गाची होणारी आत्महत्या तर कधी सासू सुनेच्या आत्महत्या कधी आपल्या म्हातारपणाच्या वयोवृध्द जीवनाला कंटाळून वयोवृध्दांच्या आत्महत्या. कधी स्त्रीच्या आत्महत्या तर कधी पुरुषांच्या आत्महत्या. कधी लहान बालकांच्याही आत्महत्या तर कधी तरुणवर्गाच्या आत्महत्या. आत्महत्या होण्याला जबाबदार आहे निराशता. निराशता ही नेहमीच जीवनात येत असते. ज्याप्रमाणे सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख येतं. तशीच निराशताही येत असते. तसं पाहिल्यास आजच्या काळात कोणताच घटक सुखी नाही. साधं दगडाचं उदाहरण घेतल्यास तोही सुखी नाही. त्यालाही उन, पाऊस, थंडी, वारा झेलावं लागतं. ज्यातून त्याचे तुकडे होतात. तसा सजीव घटकही सुखी नाही. सजीव प्राण्यांनाही दुःख नसतं असं नाही. त्यांनाही दुःख असतंच. त्यांना तर जंगलात असतांना सुरक्षीतता नसते. तसं माणसांनाही दुःख असतं. परंतु त्यावर आत्महत्या हा उपाय नाही. परंतु आत्महत्या घडतातच. आत्महत्या थांबवता येवू शकतात, त्या रोखताही येवू शकतात. जर आपण एखाद्या गंभीर प्रश्नांवर निराशा न बाळगता चर्चा केली तर त्या चर्चेतून आत्महत्या थांबतात.

# जांबूत ग्रामपंचायतीत सरपंच दत्तात्रय जोरी यांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर; सत्ताबदलाचे संकेत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**जांबूत :** जांबूत ग्रामपंचायतीतील सरपंच दत्तात्रय जोरी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास ठरावावर चर्चा व मतदान घेण्यासाठी अधिकारी तथा शिरूर तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेकडे गावासह संपूर्ण परिसराचे लक्ष लागले होते.

विशेष सभेसाठी ग्रामपंचायतीचे एकूण नऊ सदस्य उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी अविश्वास ठरावाचा विषय अधिकृतरीत्या मांडण्यात आला. त्यानंतर सदस्यांना आपापली भूमिका मांडण्याची संधी देण्यात आली. चर्चेदरम्यान काही सदस्यांनी सरपंच दत्तात्रय जोरी यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

प्रशासनात पारदर्शकतेचा अभाव, निर्णय प्रक्रियेत सदस्यांचा पुरेसा सहभाग नसणे, तसेच काही विकासकामे रखडल्याच्या मुद्द्यांवरून सरपंचांवर टीका करण्यात आली.



तर काही सदस्यांनी गावातील मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर विकासकामांबाबत असमाधान व्यक्त केले. या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर वातावरण काही काळ तापलेलेही पाहायला मिळाले.

यानंतर नियमानुसार मतदान प्रक्रिया पार पडली. उपस्थित सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केल्याने सरपंच दत्तात्रय जोरी यांच्याविरोधातील अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला.

या निर्णयाची अधिकृत नोंद सभेच्या इतिवृत्तामध्ये करण्यात आली असून सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षऱ्याही घेण्यात आल्या.

अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतर जांबूत ग्रामपंचायतीतील सत्तासमीकरणात मोठा बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नियमानुसार पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून नवीन सरपंच निवडीसाठी लवकरच हालचाली सुरू होणार असल्याची चर्चा गावात रंगू लागली आहे.

या घडामोडींमुळे गावाच्या राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात झाली असून, सरपंचपदासाठी इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरू झाल्याचे दिसून येत आहे. विविध गटांकडून आपापल्या बाजूने पाठिंबा मिळवण्यासाठी हालचाली वेग घेत असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, या संपूर्ण घडामोडींमुळे जांबूतसह शिरूर तालुक्याचे लक्ष आता या ग्रामपंचायतीतील पुढील राजकीय हालचालींकडे लागले आहे.

# "अचूक नोंदणी, प्रगत शिरूर"

## स्वयं जनगणनेसाठी नागरिकांना नगराध्यक्षा पाचर्णे यांचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** शिरूर नगर परिषद हद्दीत जनगणना २०२७ या राष्ट्रीय महत्त्वाच्या उपक्रमास सुरुवात झाली असून, यंदा ही जनगणना डिजिटल आणि आधुनिक पद्धतीने राबविण्यात येत आहे. नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून शहराच्या विकासात हातभार लावावा, असे आवाहन नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांनी केले आहे.

नगराध्यक्षा पाचर्णे यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून शहराच्या भविष्यातील विकासाच्या आराखड्याचा आधार आहे.केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारा निधी, पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षणाच्या योजना यांचे नियोजन जनगणनेतील अचूक माहितीवर आधारित असते.त्यामुळे प्रत्येक नागरिकाची नोंद अत्यंत महत्त्वाची आहे. केंद्र शासनाने नागरिकांसाठी स्वयं जनगणना ही सुविधा उपलब्ध करून दिली असून, दिनांक १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांनी स्वतःची माहिती ऑनलाईन नोंदवावी.त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक घरभेटी देऊन माहितीची पडताळणी करतील. शिरूर नगर परिषदेकडून जनगणना कामकाजासाठी सुसज्ज यंत्रणा उभारण्यात आली असून, १०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. शहरातील प्रत्येक प्रभागात नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू आहे.




स्वयं जनगणना ही सोपी व जलद प्रक्रिया असून, नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवावा.नगर परिषद प्रशासनाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अधिकृत संकेतस्थळावर जाऊन माहिती भरावी.प्राप्त माहिती जतन करून ठेवावी.प्रगणक भेटीवेळी आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे.

- मितेश गादिया, उपनगराध्यक्ष शिरूर नगरपरिषद

### शहराच्या विकासासाठी प्रत्येक नोंद महत्त्वाची

शिरूर शहराच्या भावी विकासासाठी अचूक व संपूर्ण जनगणना ही अत्यावश्यक आहे. माझी माहिती – माझ्या शहराचा विकास हा संकल्प अंगीकारून नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा.

- प्रितम पाटील, मुख्याधिकारी शिरूर नगरपरिषद

# नसरापूर अत्याचार प्रकरणी शिरूरमध्ये संताप; आरोपीला कठोर शिक्षेची मागणी




■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** नसरापूर येथे घडलेल्या अमानुष लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ शिरूरल संतापाची लाट उसळली असून, आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा करावी, अशी मागणी शिरूरकरांच्यावतीने करण्यात आली.या पार्श्वभूमीवर विविध संस्था संघटना, सामाजिक, राजकीय आणि नागरिक संघटनांच्या प्रतिनिधींनी शिरूर पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस निरीक्षक संदेश केंजळे व नायब तहसीलदार प्रकाश मुसळे यांना निवेदन सादर केले.

यावेळी शिरूरच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे, उपनगराध्यक्ष मितेश गादिया, नगरसेवक रवी उर्फ शाम मनोहर ढोबळे, नगरसेविका आयेशा सय्यद, संगीता मल्लाव, शोभना पाचंगे, शशिकला काळे, प्रिया बिरादार, सविता बोरुडे, उषा वाखारे, बापु सानप, डॉ.संतोष पोटे, प्रितेश फुलडाळे, योगेश जामदार यांसह अनेक महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालयात करून आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी यावेळी निवेदन देऊन करण्यात आली.

# महाराष्ट्र शासनाच्या निवृत्ती वेतनधारकांची बैठक संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना पुणे या संघटनेची बैठक नुकतीच शारदा विद्या मंदीर राहाता या ठिकाणी निवृत्त सहकार अधिकारी रमेश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता व सहसचिव मनोहर पोकळे म्हणाले की, सरकारी सेवेतून निवृत्त झालेल्या कृतिशील व्यक्तींना एकत्र आणुन त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा व त्यांच्या स्वतःच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत रहावेत. या उद्देशाने कृतिशील निवृत्त अधिकारी, कर्मचारी मध्यवर्ती संस्था कार्यरत झाली आहे. संघटनेचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र असुन जवळपास सर्वच जिल्ह्यात संघटनेचे काम सुरु झाले आहे. सेवानिवृत्तांचे निवृत्तीवेतन विषयक प्रश्न सोडविणे, त्यांच्या सुरक्षिततेची व स्वास्थ्याची काळजी घेणे ही कामे संघटनेमार्फत प्राधान्याने करण्यात येत आहेत. तसेच संघटना सेवानिवृत्त व जेष्ठांसाठी आरोग्य तपासणी तसेच व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्र, संमेलने आयोजित करणे, सभासदांचे हितसंबंध वृंधीगत व्हावेत या व अशा विविध बाबींच्या दृष्टीने सामाजिक बांधीलकी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. नोकरांसाठी जीवन जगण्याच्या निर्देशांकावर वेतनश्रेणी ठरविली जाते. त्यासाठी समिती नेमुन निर्णय घेतला जातो. जगातील लोकसंख्येच्या १.२५ टक्के लोकांनाच निवृत्ती वेतन मिळते.

# भांडण सोडवायला गेलेल्या तरुणावर तलवारीने हल्ला; गाडी अंगावर घालून मारण्याचा प्रयत्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**यवत :** पुणे–सोलापूर महामार्गावरील यवत गावच्या हद्दीत भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एका तरुणावर तलवारीने वार करून तसेच अंगावर गाडी घालून जिवे मारण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी यवत पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्रविण नंदू दोरगे (वय २८, रा. यवत) यांचे सोलापूर–पुणे महामार्गावर ऑस्करवाडी मिसळजवळ 'लाला पान शॉप' नावाचे दुकान आहे. ४ मे रोजी रात्री दुकानासमोर काही जण भांडत असल्याने प्रविण यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर संबंधित व्यक्ती तेथून निघून गेले.

मात्र काही वेळाने आरोपी यश दिपक मोहीते (रा. बारामती), अनिकेत केशवकुमार नामदास (रा. इंदापूर) आणि एक अनोळखी इसम पुन्हा दुकानासमोर आले. तू आमच्या भांडणात मध्यस्थी का केली? असे म्हणत त्यांनी प्रविण यांना शिवीगाळ केली.

यावेळी यश मोहीते याने तलवारीने प्रविण यांच्या गळ्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. प्रविण यांनी वार चुकवल्याने तलवार त्यांच्या डाव्या हातावर लागली व ते जखमी झाले. त्यानंतर अनिकेत नामदास याने दगडफेक केली. जखमी अवस्थेत प्रविण पळून जात असताना आरोपींच्या गाडीचालकाने त्यांच्यावर भरधाव गाडी घालून चिरडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी बाजूला उडी मारल्याने जीव वाचला.

या घटनेमुळे परिसरात घबराट पसरली आहे. यवत पोलिसांनी भारतीय न्याय संहिता व शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक मारुती मेतलवाड पुढील तपास करत आहेत.

# गहाळ झालेले साडेतीन लाख रूपयांचे मोबाईल मुळ मालकांना केले परत

## ओतूर पोलिसांची कामगिरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतुन वेगवेगळया ठिकाणावरून गहाळ झालेले साडेतीन लाख रूपये किमतीच्या १० मोबाईलचा शोध घेऊन, ओतूर पोलीसांनी मुळ मालकांना त्यांचे मोबाईल परत केल्याची माहिती ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना श्री बाजगीरे म्हणाले की,

ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतुन वेगवेगळ्या ठिकाणावरून एकुण दहा मोबाईल गहाळ झाले होते. त्याबाबतची माहिती मोबाईल धारकांनी ओतूर पोलीस स्टेशनला दिली होती.सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर गहाळ झालेल्या सर्व मोबाईलचे तांत्रीक विश्लेषण करून, तीन लाख पन्नास हजार रूपये किमतीचे एकुण दहा मोबाईल वेगवेगळया जिल्ह्यातुन ताब्यात घेण्यात आले.

मोबाईलच्या मुळ मालकांना पोलीस ठाण्यात बोलावुन बोलावून घेऊन जुन्नरचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या हस्ते एकुण सात मोबाईल सुपूर्त करण्यात आले आहेत.ओतूर पोलीसांच्या कामगीरीचे मोबाईल धारक व परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे.



सदरची कामगिरी जुन्नरचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरिक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संदिप आमणे, पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, पोलीस हवालदार बाळशिराम भवारी, पोलीस कॉन्टेबल आशिष जगताप तसेच पोलीस मित्र मुस्तफा मनियार यांनी केली आहे.

# अहिल्यानगरात ३२ वर्षीय युवक बेपत्ता; कोतवाली पोलिसांकडून शोध

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील श्रीकृष्ण नगर परिसरातून एक ३२ वर्षीय युवक बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

पोहेको/१५१ शरद चंद्रकांत वाघ (कोतवाली पोलीस स्टेशन) यांनी दिलेल्या माहितीनुसार, मिसिंग रजिस्टर क्रमांक ३८/२०२६ प्रमाणे दि. ०४ मे २०२६ रोजी ही नोंद करण्यात आली आहे. बेपत्ता झालेल्या युवकाचे नाव वैभव दत्तात्रय झरेकर (वय ३२ वर्षे, रा. श्रीकृष्ण नगर, कल्याण रोड, सागर आर्ट्स, गणपती कारखान्यासमोर, ता. जि. अहिल्यानगर) असे आहे.

दि. ०४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८.०० वाजण्याच्या सुमारास वैभव झरेकर हा



आपल्या राहत्या घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेला. त्यानंतर तो घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी नातेवाईक व परिसरात शोध घेतला, मात्र त्याचा काहीही मागोवा लागला नाही.

अखेर या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

वर्णन: वैभव झरेकर याचा शरीरयष्टी सडपातळ असून उंची अंदाजे ५ फूट ३ इंच आहे. रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे, नाक सरळ व डोळे काळे आहेत. अंगात काळी पॅन्ट व काळ्या–पांढऱ्या रेघांचा शर्ट परिधान केलेला होता. त्याच्याकडे मोबाईल क्रमांक ९९७५४५१०३१ होता.

सदर व्यक्तीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी कोतवाली पोलीस स्टेशन (दूरध्वनी: ०२४१–२४१६११७), पोहेको शरद वाघ (मो. ९५९४५५५८९९) किंवा विशाल झरेकर (मो. ९०९६५९६५४४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

या घटनेचा पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

# पुरंदरच्या शिरपेचात मानाचा तुरा : ओंकार कड यांची एनडीए परीक्षेत देशात ३६ वी रँक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुरंदर :** मेहनत, जिद्द, चिकाटी आणि देशसेवेची प्रबळ ओढ असेल तर कोणतेही उद्दिष्ट गाठता येते, हे नायगाव येथील ओंकार प्रितम कड यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (यूपीएससी) सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) परीक्षेच्या निकालात ओंकारने अखिल भारतीय स्तरावर ३६ वा क्रमांक पटकावत पुरंदर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विशेष म्हणजे हे यश त्याने पहिल्याच प्रयत्नात संपादन केले आहे.

ओंकारने सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि प्रामाणिक कष्टांच्या जोरावर हे यश मिळवले. त्याने यापूर्वीही शैक्षणिक क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले होते. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नायगाव ग्रामस्थांच्या वतीने त्याचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्नेहा तावरे यांच्या गणेश वंदनेने झाली.

या कार्यक्रमास निवृत्त लेफ्टनंट कर्नल एस. डी. हंगे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय कोलते, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. कड, अक्षरसृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार, मेजर दीपक जांभळे, सुबेदार मेजर संपत जगताप, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अजिंक्य कड, आचार्य अत्रे



प्रतिष्ठानचे सचिव गौरव कोलते, सोमेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष बाळासाहेब कामथे,पुरंदर सैनिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष नामदेव कुंभारकर, किशोर खळदकर,राहुल कड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना लेफ्टनंट कर्नल हंगे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे, फक्त त्यांना योग्य दिशा आणि मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. ओंकार कड याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. एनडीए ही केवळ परीक्षा नसून ती देशसेवेचा मार्ग आहे. अशा यशस्वी तरुणांमुळे देशाचे भवितव्य अधिक सक्षम होत आहे. ओंकारसारख्या विद्यार्थ्यांनी इतर तरुणांसाठी प्रेरणास्थान बनावे.

"देशसेवा हेच माझे पहिले उद्दिष्ट होते आणि त्यासाठी घेतलेल्या कष्टाचे आज चीज झाले आहे. कुटुंबाचे पाठबळ, योग्य मार्गदर्शन आणि एएफपीआय कोल्हापूर येथील शिक्षणामुळे हे यश संपादन करता आले."

- ओंकार प्रितम कड

यावेळी विजय कोलते यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, देशाला सक्षम आणि कर्तबगार सैन्य अधिकारी मिळावेत यासाठी खडकवासला येथे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांनाही या माध्यमातून मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. मागील वर्षी पुरंदर तालुक्यातील पिसर्वे येथील नंदिनी नंदकुमार वायकर यांनी येथे प्रवेश घेऊन यश संपादन केले आहे.

ओंकारने घेतलेल्या परिश्रम, अभ्यासातील सातत्य आणि मुलाखतीतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर एनडीए परीक्षा उत्तीर्ण केली. या यशामुळे भारतीय सैन्यात अधिकारी पदावर त्याची निवड होणार आहे.

मार्गदर्शन आणि पोषक वातावरणाची काही प्रमाणात कमतरता असतानाही ओंकारने देशसेवेचा कठीण मार्ग निवडत हे यश संपादन केले. त्याचे हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. त्याचबरोबर इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरत आहे.

या वेळी गावातील आजी–माजी पदाधिकारी, महिला, तरुण, माजी सैनिक आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलेश आडसुळ यांनी केले. त्यांना माजी सरपंच संपत कड आणि बाळासाहेब कड यांनी सहकार्य केले. आभार प्रदर्शन पल्लवी कड यांनी केले.

# अहिल्यानगरमध्ये पाणीटंचाईने नागरिक त्रस्त; प्रशासनाविरोधात संताप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहर व उपनगरांमध्ये गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.



नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत बोरुडे, रोहन फडतरे यांच्यासह नागरिकांनी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांना निवेदन देत पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गरज वाढलेली असताना वीज वितरणातील अडचणी, भारनियमन आणि नियोजनाच्या अभावामुळे वेळेवर व पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

पाणीपुरवठ्याबाबत माहिती विचारण्यासाठी संबंधित वॉलमनशी संपर्क साधल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

पाणीपुरवठ्याच्या नोंदी व्यवस्थित न ठेवणे आणि नागरिकांच्या स्वाक्षऱ्या न घेणे यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाल्याचे सांगण्यात आले.

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन ठोस निर्णय घ्यावेत तसेच निष्काळजी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# पै. नाना डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. आळंदी रोड, चऱ्होली बुद्रुक (जि. पुणे) येथे हा सन्मान सोहळा पार पडला. दिघी येथील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद वाघ यांच्या हस्ते डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र व स्मृतीचिन्ह पुरस्काराचे स्वरुप होते.



या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपती पोलीस पदक विजेते सिताराम नरके, कार्यक्रमाचे अध्यक्ष उमेश चव्हाण, फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत चव्हाण, सचिव जयश्री सोनवणे, गझलकार रज्जाक शेख, आनंदा साळवे, अभिनेते अतुल गुंजाळ आदी उपस्थित होते.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे.

# तुळापूरमध्ये घरफोडीचा प्रयत्न; महिलेवर ब्लेडने हल्ला

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील तुळापूर येथे अज्ञात दरोडेखोरांनी हल्ला करत दरोडा टाकला. या धक्कादायक घटनेमुळे या परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या घटनेत रमेश बाबुराव हारदे यांच्या सुनेवर अज्ञात चोरट्यानी ब्लेडने वार केल्याची माहिती समोर आली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी घरात घुसून दरोडा टाकत चोरी केली. दरम्यान घरातील सुनेने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता तिच्यावर ब्लेडने हल्ला करण्यात आला. जखमी अवस्थेत तिला तात्काळ उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी परिसराची पाहणी सुरू केली असून पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे. या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके तयार केली असून, पोलिस पथक या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून माहिती घेत आहे.

# छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या एच.एस.सी. निकालाची परंपरा कायम

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव-कोळपेवाडी येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने एच.एस.सी. निकालाची परंपरा कायम राखली असून यावर्षी निकालात चारही शाखांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. ज्युनिअर कॉलेजचा एकूण निकाल ९१.४०% लागला आहे. यामध्ये वाणिज्य शाखेचा शेकडा निकाल ९७.८७%, विज्ञान शाखेचा शेकडा निकाल ९२.३०% तर कला शाखेचा शेकडा निकाल ८४.६१% एवढा लागला असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य प्रकाश चौरे यांनी दिली आहे.

वाणिज्य शाखेत कु. सायली राजेंद्र भुसे हिने ७८.५०% गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या कृष्णा रमेश धसे याने ७३.३३% गुण मिळविले आहे. तर कु. सायली नवनाथ शेजवळ हिने ७२.१७ % गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. कला शाखेत मोरे साईनाथ ज्ञानेश्वर विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक ७५.३३% गुण मिळवत प्रथम क्रमांक, शेख असिफ राजू या विद्यार्थ्याने ७३.१७ गुण मिळवत द्वितीय तर शेळके सारंग अरुण या विद्यार्थ्याने ६८.६७% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. विज्ञान शाखेत गावंडे यश अजय या विद्यार्थ्याने ७१.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक, गायकवाड अभिषेक बापूसाहेब ६३.६७% गुण मिळवून द्वितीय तर हम्जा हुसेन सय्यद या विद्यार्थिनीने ६३.००%गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. किमान कौशल्य विभागात तूपसैंदर सौरभ अनिल या विद्यार्थ्याने ६१.७०% गुण मिळवत प्रथम क्रमांक, गावित्रे सनी सुभाष या विद्यार्थ्याने ६१.२०% गुण मिळवून द्वितीय तर तर ब्राम्हणे सचिन सोमनाथ याने ६०.००% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षकांचे मा.आ. अशोकराव काळे, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अध्यक्ष आ.आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन व विकास समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, माता पालक संघ, शिक्षक पालक संघ व सर्व समित्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य तसेच पंचक्रोशीतील सर्व शिक्षणप्रेमी पालक, ग्रामस्थ यांनी देखील अभिनंदन केले आहे.

# नाकाबंदीत संशयित कार जप्त; पुण्यातील गंभीर गुन्ह्याशी संबंध उघड

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहर वाहतूक शाखेने निलक्रांती चौक येथे राबविलेल्या विशेष नाकाबंदी कारवाईदरम्यान संशयित वाहनावर कारवाई करत ती कार पुण्यातील गंभीर गुन्ह्यातील असल्याचे उघडकीस आणले. संबंधित वाहन पुढील तपासासाठी पुणे शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



ही कारवाई १५ एप्रिल २०२६ रोजी पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या आदेशान्वये तसेच शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयित वाहन थांबवून ई-चलन मशीनद्वारे तपासणी करण्यात आली. त्यावेळी वाहनावर अलर्ट प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कार ताब्यात घेतली. पुढील तपासात चक-१२-तत-५६३६ क्रमांकाची ह्युंदाई व्हर्ना ही कार पुणे शहरातील नांदेड सिटी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्याशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस कॉन्स्टेबल दिपक सरोदे आणि रामराव शिरसाठ यांनी नांदेड सिटी पोलिसांशी समन्वय साधून माहितीची पडताळणी केली. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ६ मे २०२६ रोजी सदर वाहन पोलीस उपनिरीक्षक प्रसाद जोशी यांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.

## सोनी सब कलाकारांनी मदर्स डेनिमित्त त्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या स्त्रीला दिला हृदयस्पर्शी सलाम

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** मदर्स डे हा फक्त दिनदर्शिकेतील एक दिवस नाही. हा क्षण आहे थांबून त्या शांत सामर्थ्याला, अमर्याद संयमाला आणि निस्वार्थ प्रेमाला वंदन करण्याचा, जे आई आयुष्यभर देते पण कधीही परतफेडीची अपेक्षा ठेवत नाही. यंदा आईचा दिवस साजरा करताना सोनी सबचे कलाकार गुलकी जोशी, दीक्षा जोशी, नितीन बाबू आणि ऋषी सक्सेना यांनी त्यांच्या आयुष्यातील अनोख्या आठवणी, जपलेल्या क्षणांचा आणि पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या जीवनमूल्यांचा अनुभव शेअर केला. कलाकारांनी त्यांच्या आईबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली, ज्या त्यांच्या भावनिक आधारस्तंभ ठरल्या आहेत. प्रत्येक आव्हानात आणि प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या आईने त्यांना प्रोत्साहन दिले, आणि पडद्यावर तसेच पडद्यामागे त्यांचा प्रवास घडवला. गुलकी जोशी, जी यादें मध्ये सृष्टीची भूमिका साकारते, तिने सांगितले, लहानपणापासून माझी आई माझी सर्वात मोठी पाठीराखी राहिली आहे आणि ती माझ्यासाठी धैर्याचं प्रतीक आहे. तिचं ते रूप मी आजही मनात जपून ठेवते. ती माझ्या आयुष्यातील सर्वात ताकदवान स्त्रियांपैकी एक आहे.

# राहुरी तालुका वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड डी. आर. तोडमल बिनविरोध

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुका वकील संघाच्या सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड डी. आर. तोडमल यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडणुकीत इतर पदाधिकारीही एकमताने निवडून आले.

उपाध्यक्षपदी ॲड प्रकाश मारुती संसारे, महिला उपाध्यक्षपदी ॲड जयश्री दत्तात्रय घावटे, सचिवपदी ॲड शशीकांत गजानन देशमुख (बिनविरोध), सहसचिवपदी ॲड राहुल दिवे, खजिनदारपदी ॲड असीफ शेख, सहखजिनदारपदी ॲड दीपक सगळगिळे यांची निवड झाली. तसेच सदस्यपदी ॲड विशाल फिलीफ संसारे, ॲड मनोज दत्तात्रय पारखे, ॲड नवेद एकबाल बागवान, ॲड सुरेखा विजय कुलकर्णी, ॲड विद्या बाळकृष्ण अनाप व ॲड अनिता बाळासाहेब तोडमल यांची निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जेष्ठ सदस्य ॲड बी. बी. उऱ्हे यांनी कामकाज पाहिले,



तर ॲड पागिरे यांनी त्यांना सहकार्य केले. निवडणूक प्रक्रिया अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड डी. आर. तोडमल यांनी राहुरी येथे जिल्हा व सत्र न्यायालय सुरू करण्यासाठी, नवीन इमारत उभारणीसाठी तसेच वकिलांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे जेष्ठ सदस्य ॲड आर. जे. म्हसे, ॲड आर. एम. उंडे, माजी अध्यक्ष ॲड मोरे, ॲड नवले, ॲड आघाव, ॲड पवार, ॲड देशमुख, ॲड भिंगारदे, ॲड रसाळ आदींसह सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.

# राजभवन (लोकभवन) मार्ग विस्तारीकरणाला गती; कामाचा शुभारंभ, वाहतूक कोंडीवर लवकरच दिलासा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** पाषाण-औंध परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या राजभवन रोड (सद्य: लोकभवन मार्ग) विस्तारीकरण प्रकल्पाला अखेर गती मिळाली असून, आज या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ करण्यात आला. आमदार सिद्धार्थ शिरोळे व उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या उपस्थितीत कामाची सुरुवात झाली.



या मार्गाच्या मधोमध असलेल्या पोलीस विभागाच्या काही हेरिटेज वास्तूंमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. आवश्यक परवानग्या उपलब्ध असूनही विभागांतील समन्वयाच्या अभावामुळे प्रकल्प प्रलंबित राहिला होता. याबाबत नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी सातत्याने पाठपुरावा करत अतिरिक्त आयुक्त दिवटे यांची भेट घेऊन अडथळ्यांचे निराकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. या पाठपुराव्याची दखल घेत प्रशासनाने संबंधित पोलीस इमारतींचे स्थलांतर व हटविण्याची प्रक्रिया सुरू केली असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून कामाची सुरुवात करण्यात आली आहे. त्यानंतर आज रस्त्याच्या विस्तारीकरणाच्या कामाला प्रत्यक्ष प्रारंभ झाल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. राजभवन (लोकभवन) मार्ग हा पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असून, या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक तसेच व्हीआयपींची ये-जा होत असते. त्यामुळे या रस्त्याच्या विस्तारीकरणामुळे औंध-पाषाण परिसरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

## संक्षीप्त वृत्त

### स्नॅपड्रॅगन एँ ८ एलीट जनरेशन ५ ने युक्त असलेला वनप्लस पॅड ४ टॅब्लेट भारतात खरेदीसाठी उपलब्ध

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान ब्रॅण्ड वनप्लसने आज आपले वनप्लस पॅड ४ हे उत्पादन विक्रीसाठी खुले करत असल्याची घोषणा केली. पीसीच्या तोडीची कामगिरी, दृश्यात्मकता व उत्पादनक्षमता पोर्टेबल स्वरूपात देण्याच्या दृष्टीने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. या उपकरणाची किंमत ५४, ९९९ रुपयांपासून सुरू होत आहे. अमेझॉन.इन, फ्लिपकार्ट, वनप्लस. इन वनप्लस स्टोअर ॲप, वनप्लस एक्स्पिरिअन्स स्टोअर आणि निवडक ऑफलाइन पार्टनर्सकडे ते विक्रीसाठी उपलब्ध असून, काही बँकांशी निगडित सवलती उपकरणाच्या किमतीवर जाहीर करण्यात आल्या आहेत.

वनप्लस पॅड ४ स्नॅपड्रॅगनएँ ८ एलीट जनरेशन ५ तंत्रज्ञानावर आधारित असल्याने आजवरचा तो सर्वांत शक्तीशाली वनप्लस टॅब्लेट आहे. १२ जीबी एलपीडीडी आर५एक्स रॅम क्षमतेचे आणि ५१२ जीबी यूएफएस ४.१ स्टोरेजने युक्त असे हे उपकरण मल्टिटास्किंग, गेमिंग तसेच सर्जनशील कार्यप्रवाहासांठी वेगाने व सुविहितपणे काम करते.

### महाराष्ट्रातील ६० 'मॉडेल सब-रजिस्ट्रार' कार्यालयांच्या तंत्रज्ञान आधारित परिवर्तनासाठी व्हीएफएस ग्लोबल कन्सोर्टियमला महत्त्वाचा करार प्राप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सरकारी सेवा सुरक्षितपणे पुरवणारी जागतिक तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी 'व्हीएफएस ग्लोबल' आणि 'वी एक्सेल सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या कन्सोर्टियमने महाराष्ट्र सरकारच्या नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक (आयजीआर) विभागाकडून पाच वर्षांचे कंत्राट प्राप्त केले. याअंतर्गत राज्यातील मालमत्ता नोंदणी प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने ६० अत्याधुनिक 'मॉडेल सब-रजिस्ट्रार कार्यालये' (एसआरओ ) सुरू केली जातील.हे कन्सोर्टियम महाराष्ट्रातील या मॉडेल सब-रजिस्ट्रार कार्यालयांची संपूर्ण उभारणी करेल, ज्यात मालमत्ता नोंदणी सेवांचे आधुनिकीकरण करण्यासाठी अत्याधुनिक डिजिटल पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचारी रुजू केले जातील.ही अत्याधुनिक केंद्रे जलद कार्यवाही व प्रभावी सेवा देण्यासाठी डिझाइन केली जाणार असून, प्रशस्त, आधुनिक आणि पूर्णपणे वातानुकूलित सुविधा उपलब्ध असतील.

### मणकर्णा पटारे यांचे निधन


■ जनप्रवास प्रतिनिधी



**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील जुन्या पिढीतील प्रगतशील शेतकरी कुटुंबातील , मणकर्णा भास्करराव पटारे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्ष होते त्यांच्या पश्चात एक मुलगा ३ मुली, नातू, सुना- नातवंडे असा परिवार असून एसटी महामंडळाचे श्रीरामपूर आगाराचे संघटनेचे अध्यक्ष अमोल पटारे व विशाल पटारे यांच्या त्या आजी होत.

### सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजचे बारावी परीक्षेत निर्भेळ यश

**बारावीच्या परीक्षेत सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के; कठोर परिश्रम, समर्पण व जिद्द हाच यशप्राप्तीचा मार्ग**




■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात 'सूर्यदत्त' महाविद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत यशस्वी घोडदौड केली आहे. महाविद्यालयातील एमसीव्हीसी शाखेचा १०० टक्के, विज्ञान शाखेचा ९७ टक्के, वाणिज्य शाखेचा ९० टक्के तर कला शाखेचा ८८ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून तन्मय अनिकेत जहागीरदार (८९.६७ टक्के) प्रथम, इशिता समीर पाटील (८८.१७ टक्के) द्वितीय, तर ऋतुजा प्रताप मगर (८८ टक्के) तृतीय, वाणिज्य शाखेतून वरुण हर्षद जहागीरदार (८९.६७ टक्के) प्रथम, दिलीप सावराम सोळंकी (८५.६७ टक्के) द्वितीय, रिषभ अरविंद चौहान (८४.३३ टक्के) तृतीय, कला शाखेतून गौरी विवेक देशपांडे (८९.८३ टक्के) प्रथम, अमूल्य लक्ष्मण सोनार (८२.६७ टक्के) द्वितीय, निशी संजय मावडीया (८१.६७ टक्के) तृतीय, तर एमसीव्हीसी शाखेतून एलिझाह मेनेजस (६९.६७ टक्के) प्रथम, ओम अमोल शिंदे व जय ऋषिकेश रेळेकर (६७.३३ टक्के) द्वितीय आणि अजय बाळासाहेब नागरे (६४ टक्के) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

# नाविन्यपूर्ण विस्तार पद्धतीने तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा : कुलगुरू डॉ. विलास खर्चे

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** विद्यापीठात विकसित होणाऱ्या संशोधनाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. बदलत्या परिस्थितीत शेतीसमोर विविध आव्हाने उभी राहत असून संतुलित खतांचा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. यासाठी विद्यापीठामार्फत संतुलित खत वापर जागरूकता अभियान – २०२६ राबविण्यात येत आहे. प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवण्यासाठी शास्त्रज्ञांनी नाविन्यपूर्ण विस्तार पद्धतींचा अवलंब करावा, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

धुळे येथील शासकीय कृषी महाविद्यालयाला भेटीदरम्यान ते मार्गदर्शन करत होते. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, मुक्ताईनगर (जि. जळगाव) येथील कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील, पशुविज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. राहुल देसले, कृषी अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. विश्वनाथ शिंदे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ



डॉ. दिनेश नांद्रे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ. खर्चे यांनी हवामान अनुकूल शेती, नैसर्गिक शेतीचा प्रसार आणि एकात्मिक शेती पद्धती यावर भर देण्याची गरज व्यक्त केली. ग्रामीण युवकांना शेतीकडे वळवण्यासाठी कृषी उद्योजकता विकास, शेतकरी उत्पादक कंपन्यांना तांत्रिक पाठबळ तसेच 'फुले समृद्धी गाव' संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान संतुलित खत वापर जागरूकता अभियान – २०२६ या भित्तीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. कुलगुरूंनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधन व विस्तार कार्याचा आढावा घेत विविध विभागांना भेटी देऊन मार्गदर्शन केले. तसेच बाजरी संशोधन केंद्र व कृषी विज्ञान केंद्रालाही भेट देत तेथील कामकाजाचा आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बी. एम. इल्हे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. राहुल देसले यांनी शैक्षणिक कार्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जगदीश काथपुरी यांनी केले व आभार डॉ. विकास पवार यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विभागप्रमुख, प्रकल्प समन्वयक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हुंड्यासाठी छळ ! विवाहितेचा विहिरीत उडी घेऊन शेवट

## ४ लाखांसाठी छळणाऱ्या सासरच्यांविरुद्ध गुन्हा दाखल, राहाता तालुक्यातील घटना

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** पैशांची हाव माणसाला किती क्रूर बनवू शकते, याचा धक्कादायक प्रत्यय राहाता तालुक्यात आला आहे. घराच्या बांधकामासाठी माहेरून ४ लाख रुपये घेऊन ये, या मागणीसाठी एका २३ वर्षीय तरुण विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ करून तिला आत्महत्येला प्रवृत्त केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. प्रिया शुभम ढगे असे या दुर्दैवी मृत विवाहितेचे नाव असून, याप्रकरणी पती, सासरा आणि सासू यांच्याविरुद्ध राहाता पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मे २०२४ पासून ते ३ मे २०२६ पर्यंत सासरच्या मंडळींकडून प्रियाचा सतत छळ सुरू होता. घराचे बांधकाम करायचे आहे,



तुझ्या बापाकडून ४ लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी करत सासरच्यांनी प्रियाला वेळोवेळी मारहाण केली, शिवीगाळ केली आणि इतकेच नव्हे तर तिला अनेकदा उपाशीपोटी ठेवून तिचा केला. छळ सासरच्या या अमानुष त्रासाला कंटाळून अखेर प्रियाने माहेरी राहाता तालुक्यातील एकरुखे येथे वडीलांच्या राहत्या घराजवळील विहिरीत उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे . तीने आपल्या मोबाईल वरुन घरच्यांना केलेल्या व्हाटसअप मेसेज मध्ये तीला कसा त्रास दिला जात होता हे ही घरच्याना सांगीतल होत

राहाता पोलीसात अनिल बाळासाहेब बोर्डे यांनी दिलेल्या तक्रारीवरून राहाता पोलिसांनी आरोपीं शुभम राजेंद्र ढगे (पती) राजेंद्र आबासाहेब ढगे (सासरे) प्रतिभा राजेंद्र ढगे (सासू) सर्व रा. को–हाळे, ता. राहाता यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८, ८५, ११५ (१), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक कोमल कुमावत करत आहेत. ऐन तारुण्यात एका विवाहितेने सासरच्या जाचाला कंटाळून जीव दिल्याने संपूर्ण राहाता तालुक्यात संताप व्यक्त केला जात आहे.

# 'वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार श्रीरामपूरला'

## आमदार आशुतोष काळेंच्या पाठपुराव्याची आरोग्य विभागाकडून दखल; कोपरगावसह इतर चार तालुक्याच्या दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा

■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** मागील सहा वर्षात कोपरगाव विधानसभा मतदार संघातील दिव्यांग बांधवांसाठी देवदूत ठरलेले व जवळपास दीड हजाराच्यावर दिव्यागांना विनासायास दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून देणाऱ्या आमदार आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्याची आरोग्य विभागाने अखेर दखल घेतली असून यापुढे कोपरगाव मतदार संघातील दिव्यांग बांधवांना दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी श्रीरामपूरलाच वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे कोपरगावसह इतरही चार तालुक्याच्या दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोपरगाव मतदार संघातील दिव्यांगांना व त्यांच्या नातेवाईकांना वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी होणारा त्रास वाचविण्यासाठी प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सन्मानाने हक्काचे वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून द्यायचेच हा निश्चय करून आमदार आशुतोष काळे यांनी २०१९ पासून निवडून येताच दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी कोपरगाव येथून जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी मोफत बससेवा आणि त्यांना मदत करण्यासाठी आपल्या संपर्क कार्यालयाची यंत्रणा उभी केलेली आहे. हा सामाजिक उपक्रम आजतागायत सुरु असून त्याबाबत नियमितपणे सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनजागृती करून मतदार संघातील एकही दिव्यांग शासनाच्या अधिकृत दिव्यांग प्रमाणपत्रापासून वंचित राहणार नाही हा त्यांचा प्रयत्न आहे.

त्याचबरोबर कोपरगाव पासून जवळपास १०० किलोमीटर पेक्षा जास्त दूरवर असणाऱ्या अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात दिव्यांग तपासणीसाठी दिव्यांग व त्यांच्या



पालकांना होणारा त्रास कमी व्हावा यासाठी शिर्डी, राहाता, श्रीरामपूर याठिकाणी कोपरगाव तालुक्यासह जिल्ह्याच्या उत्तरेच्या तालुक्यातील दिव्यांग रुग्णांची तपासणी होवून त्यांना तिथेच वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळावे याबाबत आमदार आशुतोष काळे यांचा आरोग्यविभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु होता व हि अडचण त्यांनी पालकमंत्र्यांकडे देखील मांडली होती. अखेर पाठपुरावा फळाला आला असून पुढील महिन्यापासून दिव्यांग बांधवांना तपासणीसाठी व वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात जाण्याची गरज नाही. यापुढे श्रीरामपूर येथील उपजिल्हा रुग्णालयस्तरावरील ग्रामीण रुग्णालयात दिव्यांगांची तपासणी करून त्यांना वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे.

त्यामुळे अकोले ते अहिल्यानगर १२७, त्यानंतर संगमनेर ते अहिल्यानगर १०७, कोपरगाव ते अहिल्यानगर १००, राहाता ते अहिल्यानगर ८० व श्रीरामपूर ते अहिल्यानगर ६७ किलोमीटरचे अंतर आहे. श्रीरामपूर तालुका वगळता इतर कोपरगाव, राहाता, संगमनेर, अकोले या तालुक्यातून अहिल्यानगर जाण्याचा प्रवासाचा त्रास जवळपास निम्याने कमी होवून वेळ देखील वाचणार आहे. त्यामुळे दिव्यांग बांधवांनी विशेषत: त्यांच्या पालकांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.कोपरगाव तालुक्यासह श्रीरामपूर, राहाता, संगमनेर व अकोले तालुक्यातील दिव्यांग बांधवांची दूरवर जाण्याची अडचण कमी केल्यामुळे आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.श्रीम.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे, आरोग्यमंत्री ना.प्रकाशजी आबिटकर, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांचे दिव्यांग बांधव व त्यांच्या पालकांच्या वतीने आभार मानले आहे.

> मतदार संघातील सर्वच दिव्यांग बांधवांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी एकही दिव्यांग व्यक्ती दिव्यांग पत्रापासून वंचित राहणार नाही हा माझा प्रयत्न असून त्याचबरोबर दिव्यांग व्यक्ती व त्यांचे पालक यांना वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कमीत कमी वेळात कसे मिळवून देता येईल या उद्देशातून दिव्यागांचा प्रवासाचा निम्मा त्रास कमी करण्यात यश मिळाले आहे. कोपरगाव उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर असून दिव्यागांना येत्या काही महिन्यात कोपरगावच्या उपजिल्हा रुग्णालयातच वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून देणार आहे.
>
> - आमदार आशुतोष काळे

# राहुरी महाविद्यालयाची अनुष्का सरोदे अर्थशास्त्र विषयात बोर्डात अव्वल

## महाविद्यालयाचा एकूण निकाल ८५.९० टक्के

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** पुणे विभागीय शिक्षण मंडळाने नुकताच बारावीचा निकाल जाहीर केला असून राहुरी येथील लोकनेते रामदास पाटील धुमाळ महाविद्यालयाने यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. वाणिज्य शाखेतील कु. अनुष्का प्रवीण सरोदे हिने अर्थशास्त्र विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवत पुणे बोर्डात अव्वल स्थान पटकावले असून राहुरी तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

महाविद्यालयाचा एकूण निकाल ८५.९० टक्के लागला असून त्यामध्ये विज्ञान शाखेचा निकाल ९१.४५ टक्के, वाणिज्य शाखेचा ८८.२३ टक्के, तर कला शाखेचा ५७.३३ टक्के लागला आहे. कला शाखेतून येवले आज्ञा दीपक हिने ७३.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत अनुष्का सरोदे हिने ८८ टक्के गुणांसह आघाडी घेतली, तर विज्ञान शाखेतून लांडगे रोहित शिवाजी हा ८३.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

दरम्यान, कु. बागल श्रेया सुनील आणि कु. सय्यद नाज इजाज या विद्यार्थिनींनी डेअरी सायन्स विषयात २०० पैकी २०० गुण मिळवत राज्यस्तरावर महाविद्यालयाचे नाव झळकवले आहे. अनुष्का सरोदे हिला



अर्थशास्त्र विभागाचे प्रा. संदीप पेरणे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. अरुणसाहेब तनपुरे, जनरल सेक्रेटरी हर्षदादा तनपुरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ दळवी, माजी प्राचार्य डॉ. अनिता वेताळ, उपप्राचार्य प्रा. एम. के. उऱ्हे, पर्यवेक्षक प्रा. आप्पासाहेब आढाव, प्रबंधक गणेशराव देशमुख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# माथणी जिल्हा परिषद शाळेला लोकसहभागातून शैक्षणिक साहित्य भेट

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंददायी व कृतीयुक्त शिक्षणासाठी चेन्नई येथील रामनाथन यांच्या माध्यमातून विविध शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना हे साहित्य नुकतेच जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे उपक्रमशील अधिव्याख्याता मुकुंद दहिफळे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.



शाळेतील शिक्षक सुनील अडसूळ आणि राहुल व्यवहारे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी लोकसहभागातून विविध शैक्षणिक साहित्य मिळविण्याचा उपक्रम राबविला. त्यातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारची शैक्षणिक खेळणी आणि उपयुक्त साहित्य उपलब्ध झाले आहे. यामध्ये मॅच इट अल्फा न्यूमेरो, मॅच शेप्स, कलर ट्रॅप, कन्स्ट्रक्शन पझल, रिंगटॉस, मॅग्नेटिक लुडो, स्ट्रॉ असेंबली किट, ट्रॅंगल कलर मॅच, वुडन टॉवर, स्पीड क्यूब, प्रोजेक्ट खिलौना आदी साहित्यांचा समावेश आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सेवानिवृत्तांचे धरणे आंदोलन; दोन महिन्यांपासून पेन्शन बंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (म.जी.प्रा.) मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून निवृत्ती वेतन मिळाले नसल्यामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून आज पुण्यात धरणे आंदोलन करण्यात आले. भीषण उन्हाळ्यात वयोवृद्ध कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येत असल्याने तात्काळ पेन्शन तत्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

म.जी.प्रा. कर्मचारी संघर्ष कृती समितीच्या वतीने राज्यातील सर्व कार्यालयांसमोर आंदोलन करण्यात आले. या वेळी शासनाकडे निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली. हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत पाठविण्यात आले आहे. तसेच म.जी.प्रा. च्या मुख्य अभियंता वैशाली आवटे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष एस. डी. देशपांडे, उपाध्यक्ष स. सी. आलेकर , कार्याध्यक्ष ए. जी.



देशमुख, अरुण निर्भवणे, गजानन गटलेवार, ए. जी. देशमुख, सरचिटणीस संजय केळकर, डी . के. इनामदार, प्रिया माळी, श्रीकांत राऊत यांच्यासह शेकडो निवृत्त कर्मचारी , अभियंते उपस्थित होते.

संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, महालेखाकार कार्यालयाने लेखाशीर्ष गोठविल्यामुळे मार्च २०२६ पासून सेवानिवृत्ती वेतन देणे थांबवले आहे. तसेच वेतनासाठी वापरण्यात येणाऱ्या तात्पुरत्या कोडची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपल्याने पुढील वेतन वितरण अशक्य झाल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक आर्थिक संकटात सापडले असून त्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. औषधोपचारांसाठीही पैसे उपलब्ध नसल्याने अनेकांची प्रकृती खालावत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संघटनेने नमूद केले की, २३ मार्च २०१७ रोजी शासनाने म.जी.प्रा. कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा देऊन त्यांच्या वेतन व निवृत्ती वेतनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप पूर्णपणे झालेली नाही. या पार्श्वभूमीवर, शासनाने तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित बाबी मार्गी लावाव्यात आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्वरित पेन्शन अदा करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. म.जी.प्रा. कर्मचारी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष अरुण निर्भवणे व सरचिटणीस गजानन गटलेवार यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

# बाबुराव बोत्रेपाटील यांच्या नेतृत्वाखाली १७ साखर कारखान्यांना नवसंजीवनी; शेतकऱ्यांचे एकही रुपया थकवणार नाही : ओमराजे बोत्रेपाटील

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** बाबुराव बोत्रेपाटील यांच्या नेतृत्वाखाली ओंकार शुगर ग्रुपने महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटक या तीन राज्यांतील बंद किंवा अडचणीत सापडलेले तब्बल १७ साखर कारखाने पुनर्जीवित केले असून सुमारे ११ लाख ऊस उत्पादक शेतकरी, कामगार व ऊस तोडणी मजुरांना आर्थिक न्याय देण्याचे काम केले आहे, अशी माहिती समूहाचे संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांनी दिली.

ते म्हणाले की, सध्या एक महिन्याचे ऊस बिल शेतकऱ्यांना देणे बाकी असले तरी ते लवकरच अदा करण्यात येईल. शेतकरी आणि ऊस वाहतूकदारांचे सर्व थकित पैसे दिले जातील, कुणाचाही एक रुपयाही थकवला जाणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ओमराजे बोत्रेपाटील यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले की, समूहाने तीन राज्यांतील १७ साखर कारखान्यांद्रे सुमारे ७५ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले आहे. यामध्ये शेतकऱ्यांना सुमारे १ हजार ८३० कोटी रुपयांचे ऊस



बिल, तर ऊस तोडणी मजूर आणि वाहतूकदारांना ७१० कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. तसेच १८ हजार साखर कामगारांना पुन्हा रोजगार उपलब्ध करून देत त्यांच्या चुली पेटवण्याचे काम करण्यात आले आहे. या संपूर्ण गाळप हंगामात सुमारे ६ हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली असून ग्रामीण अर्थकारणाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

येत्या हंगामात २१ साखर कारखाने कार्यान्वित करून सुमारे १ कोटी मेट्रिक टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट असून त्यातून सुमारे ७ हजार कोटी रुपयांची उलाढाल अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या नव्या धोरणानुसार पेट्रोल व डिझेलमध्ये ३३ टक्के इथेनॉल मिश्रणाला परवानगी मिळणार असल्याने ओंकार समूहाने मोठ्या प्रमाणात मोलॅसेस साठवून ठेवले आहे.

यामधून सुमारे ६०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, राज्यातील सुमारे १४० खाजगी व सहकारी साखर कारखान्यांकडे एफआरपी पोटी सुमारे २ हजार १०० कोटी रुपये शेतकऱ्यांचे देणे बाकी असताना, ओंकार ग्रुपवर २ ते ३ हजार कोटी रुपयांचे ऊस बिल थकले असल्याच्या अफवा सोशल मीडियावर काहींकडून पसरवल्या जात आहेत. या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

शेतकऱ्यांच्या उसाला योग्य दर देऊन शेतकरी, ऊस तोडणी मजूर आणि वाहतूकदार यांची आर्थिक प्रगती साधणे हेच बाबुराव बोत्रेपाटील यांचे मुख्य ध्येय असल्याचेही ओमराजे बोत्रेपाटील यांनी स्पष्ट केले.

### स्व.शंकरराव घुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

# स्व.शंकरराव घुले यांच्या लढ्यामुळे कष्टकऱ्यांचे जीवनमान उंचावले : अविनाश घुले



■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** कष्टकरी हा समाजाचा कणा आहे आणि तो मजबूत राहिला पाहिजे. यासाठी स्व.शंकरराव घुले यांनी मोठं,मोठं आंदोलने उभे केले. हमाल पंचायतच्या माध्यमातून हमालांच्या पाठीवरचे ओझे कमी करुन खर्या अर्थाने त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. माथाडी कामगारांना त्यांचे हक्क मिळवून दिले. बाजार समितीच्या हमाल–मापाड्यांच्या प्रश्नांसाठी सरकार विरोधात आंदोलन उभे करुन अनेक प्रश्न मार्गी लावले. त्यांनी कष्टकर्यांसाठी उभारलेल्या लढ्याला राज्यभरातून समर्थन मिळाले. त्यांचा लाभ राज्यातील कष्टकर्यांनाही झाला. त्याचप्रमाणे नगराध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कार्याने एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे कार्य आजही सर्वांसाठी दिशादर्शक असेच आहे, असे प्रतिपादन हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी केले.

कष्टकर्यांचे नेते स्व.शंकरराव घुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त मार्केट यार्ड, हमाल पंचायत येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष गोविंद सांगळे, सचिव मधुकर केकाण,संजय घुले , सल्लागार अशोक बाबर, विष्णुपंत म्हस्के, सतीश शेळके , बहिरू कोतकर ,रविंद्र भोसले, सुनिल देवकर ,नारायण गीते , लक्ष्मण वायभासे, सुनील गीते ,विष्णू ढाकणे ,मच्छिंद्र दहिफळे, राजू चोरमले रत्नाबाई आजबे, आदिनाथ चेके, शेख अब्दुल गनी, नवनाथ महानुर ,श्रीमती कमल ढाणे ,चांगदेव कुसळकर, सचिन ठुबे ,डॉ.विजय कवळे, माणिक व्यवहारे,मंगेश एरंडे ,भगवान सांगळे ,सुरेश निरभवणे ,अशोक काळे ,नंदू डहाणे ,सुसे , सर्व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

# जीवनात ध्येयप्राप्तीसाठी प्रेरणा आवश्यक



प्रेरणेविषयी कोणतेही काम करणे तसे अवघडच आहे. जीवनात ध्येयप्राप्तीसाठी प्रेरणा आवश्यक आहे. शिवाय, आपण स्वत:लाच 'सेल्फ मोटिव्हेट' करत राहिलो नाही, तर आपण काहीही मिळवू शकणार नाही. प्रेरणेचा थेट संबंध आपल्याशीच जोडला असतो. उदा. एखाद्या स्पर्धेत भाग घेण्यापूर्वी जर खेळाडूला हे समजले की ही स्पर्धा जिंकल्यानंतर कोणत्याही प्रकारची ट्रॉफी दिली जाणार नाही, तर तो खेळाडू त्या स्पर्धेची तयारी म्हणावी तितकी करणार नाही.

**प्रेरणा म्हणजे तरी काय ?**

खरेतर, एखादी गोष्ट शिकण्यामागची तळमळ आणि आवडच एखाद्याला प्रेरित करत असते. या दोन्ही गोष्टींमध्ये समन्वय साधल्यावर लक्ष्य करता येऊ शकते. प्रेरणेशिवाय यशाची आशा बाळगणे म्हणजे प्रयत्नांविना अन्न मिळण्याची आशा लावून धरण्यासारखे आहे. कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी आपण स्वत:च स्वत:कडून प्रामाणिकपणे जाणून घेणे गरजेचे आहे की, आपण हे काम करण्यास इच्छुक आहोत की नाही ? आपल्या मनाने जर या गोष्टीचा होकार दिला तर सकारात्मक दृष्टीने प्रयत्न केल्यास निश्चितपणे त्या कामात यश मिळेल.

**बहाणा करणे टाळा :** यश मिळविण्याकरीता प्रयत्नांत सातत्य असायला हवे, हे काही सांगायला नकोच. काही लोक असेही असतात, जे लक्ष्याविषयी प्रामाणिक तर नसतात आणि कामापासून स्वत:ला दूर ठेवण्यासाठी काही ना काहीतरी बहाणा शोधून काढतात. आपल्या अपयशाचे खापर ते दुसऱ्यांवर फोडणे पसंत करतात. याऐवजी, लक्ष्याकडे एकाग्रतेने लक्ष दिल्यास तुम्ही निश्चितपणे यशस्वी होऊ शकाल.

**धैर्याने काम करा :** कामाला सुरूवात करताना लहान-सहान उद्दीष्टे ठरवली पाहिजेत. त्यात यश आल्यानंतर मग हळूहळू मोठ्या लक्ष्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी धैर्य बाळगणे अत्यंत आवश्यक ठरते. यश एकदम मिळत नाही, हे लक्षात घ्या. एकेक पाऊल टाकताच त्यापर्यंत पोहोचता येते.

**आत्मविश्वास जागृत करा :** आपण आपली स्वप्नं, लक्ष्य आणि इच्छा तेव्हाच पूर्णत्वाला नेऊ शकतो जेव्हा आपण आत्मविश्वासाने त्या प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करतो. आत्मविश्वासा शिवाय केली जाणारी धडपड हा एक अर्धवट प्रयत्नच ठरतो. यासाठी स्वत:कडील आत्मविश्वरस कायम जागृत ठेवा.

**प्रेरणा मिळवत राहा :** यशाची इच्छा सगळेच बाळगून असतात, पण प्रेरणेशिवाय ते अशक्य आहे. प्रेरणा ही सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन प्रकारची असते. सकारात्मक पद्धतीने स्वत:ला प्रेरित करणे जास्त चांगले ठरते. हे सत्य आहे की, प्रत्येक व्यक्ती ही काही प्रत्येक कामात पारंगत ठरू शकत नाही; पण प्रत्येक व्यक्तीचे एक वैशिष्ट्यही ठरलेले असते. आपण आपली वैशिष्ट्ये आणि आवडीनिवडी ओळखायला शिकले पाहिजे. अशामुळे मनाला आवडणारे काम करायला मिळाल्याचा आनंद तर मिळेलच शिवाय त्या कामाविषयीचा उत्साहसुद्धा टिकून राहील.

# जीवनाच्या दबावाखाली का ओसरतो दांपत्याचा उत्साह ?



आपले वैवाहिक जीवन हसरे खेळते असावे असे प्रत्येक जोडप्यालाच वाटत असते; पण बऱ्याचदा लग्नानंतर एक दोन वर्षेच पती-पत्नीतील प्रेम टिकून राहाते. विशेषतः आजच्या तरुण पिढीत तर हनीमून संपताच लग्नाची मजा ओसरताना दिसते.

लग्नानंतरचे पहिले वर्ष प्रेमाच्या धुंदीत कसे जाते हे त्या जोडप्याला कळत नाही. दुसऱ्या वर्षातील पर्दापणापर्यंत पती-पत्नींना एकमेकांच्या आवडीनिवडी समजलेल्या असतात. त्यामुळे त्यांच्यात थोडे वादही होऊ लागतात. तिसऱ्या वर्षापर्यंत एकमेकांचे व्यक्तिमत्त्व व्यवस्थित समजलेले असते. त्याचसोबत जीवन आनंदाने जगायचे असेल तर तडजोड करायलाच हवी याचेही भान त्यांना आलेले असते. जेव्हा उभयतांना आपल्या जबाबदाऱ्याची जाणीव होते आपल्याला आपल्या मुलांना शिकवून सवरून मोठे करायचे आहे. आपल्या आई वडिलांचा सांभाळ करावयाचा आहे याची जाणीव होते. दोघेही एकदिलाने स्वतःला त्यात झोकून देतात. अशी अनेक वर्षे एकमेकांच्या सहवासात कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडीत उलटतात तेव्हा त्यांना वाटू लागते की, आता आपल्या जीवनात नवे काहीही होत नाही. त्यांनी एकमेकांसोबत एवढा वेळ घालवलेला असतो की दोघेही एकमेकांना जुने झालेले असतात व त्यामुळे ते साध्या, छोट्या गोष्टीतही एकमेकांना खूश करण्याचा प्रयत्न करीत नाही. ही एक सर्वसामान्य चूक आहे. एकमेकांच्या एवढे घनिष्ठ जोडीदार असूनही ते या नात्याने उत्साह व आकर्षण कायम टिकवून ठेवू शकत नाही. त्यांच्यामध्ये एक निरुत्साहपणा, रुक्षपणा वाढत राहातो. खरे तर या वेळेपासून त्या दोघांना एकमेकांची एवढी गरज असते की जेवढी लग्नानंतरच्या पहिल्या वर्षीही नव्हती. एकमेकांसाठी आपल्याकडे काही नवे नसले तरी आपण खूप काही नवे करून एकत्र राहिल्यास यशाचा उत्सव करून जीवन रोमहर्षक, उत्साही बनवू शकता. नाते कितीही जुने झाले तरी त्याच्या भावनात्मक गरजा कधीही बदलत नसतात. जरी त्या काळानुरूप कमी जास्त होत असल्या तरी हे लक्षात ठेवायला हवे.


# आपला मेंदू किती टक्के चालतो

काही गैरसमज पिढ्यानपिढ्या इतके दृढ झालेले असतात, की खरं काय आणि खोटं काय हेच कळेनासं होतं. हे गैरसमज जर विज्ञानासंबंधी असले, तरी अधिकच कोंडी होते.

आता हेच पाहा ना, माणूस आपल्या संपूर्ण मेंदूचा वापर करत नाही, हे अनेकदा बोललं-ऐकलं-लिहिलं-वाचलं गेलंय. मग माणूस आपला किती टक्के मेंदू वापरतो ? ही आकडेवारी तुम्हाला वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी ऐकायला, वाचायला मिळेल. अगदी अडीच टक्क्यांपासून दहा टक्क्यांपर्यंत. पण हे खरं आहे का ?

वर्तमानपत्र डोळ्यांसमोर धरा आणि त्यातला एखादा लेख वाचायला सुरुवात करा. मध्येच थांबा. चित्त लेखावर एकाग्र करा आणि तो लेख आधीच्या वेगापेक्षा ९० टक्के जास्त वेगानं वाचून दाखवा.

आहे शक्य ? तुम्ही वाचताना तुमचा दहा



टक्के मेंदू वापरत आहात, असं गृहीत धरलं, तरी उरलेला नव्वद टक्के मेंदू मनात आणलं तरी तुम्हाला हव्या त्या प्रकारे तुम्ही वापरू शकत नाही, हे वास्तव आहे.

वस्तुतः इतर अवयवांप्रमाणेच मेंदूचे वेगवेगळे भाग आहेत आणि त्यांची कामं ठरलेली आहेत. बोटांनी करायची कामं तुम्ही खांद्यानं करू शकाल का ? नसला, तर तुम्ही पाच टक्केच हात वापरता, हे मान्य करणार का ? मग मेंदूच्या वापराविषयी ही चमत्कारिक आकडेवारी आली कुठून ?



गेल्या शंभर वर्षांपासून या क्षेत्रातले तज्ज्ञ डॉक्टर एक सत्य वारंवार सांगत आहेत. ते म्हणजे, माणसाच्या मेंदूचा काही भाग काढून टाकला, तरी तो जगू शकतो.

याच वाक्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आला असून, कर्णोपकर्णी अशी वाच्यता झाली, की माणूस आपला संपूर्ण मेंदू वापरतच नाही.

मग, एखादा बुद्धिमान माणूस आपला अमुक टक्के मेंदू अधिक वापरतो, अशा कंड्या पिकायला सुरुवात झाली हां हां म्हणता हे धादांत असत्य विज्ञान प्रत्येकाच्या मेंदूत शिरलं.

# पुजा करताना नेहमी का लक्षात ठेवाव्यात या ५ गोष्टी

कोणत्याही देवी-देवतांच्या पुजेमध्ये आरतीला महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. असे मानले जाते की, देवाच्या आरतीनंतरच पुजेचे कार्य पूर्ण होते. त्यामुळे पुजेमध्ये आरतीचे महत्व पाहता दिवा तयार करताना काही गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे.



विधिवत पुजा केल्याने देवाची कृपादृष्टी लवकर प्राप्त होण्यास मदत होते. त्यासाठी आज आम्ही तुम्हाला देवाच्या समोर लावण्यात येणाऱ्या दिव्यासंबंधी ५ तथ्य सांगणार आहोत.

१. शास्त्रानुसार देवांसाठी लावण्यात येणारा तुपाचा दिवा आपल्या डाव्या बाजूला तर तेलाचा दिवा उजव्या बाजूला लावावा.

२. पूजा करताना दिवा विझणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे. असे घडल्यास पूजेचे पूर्ण फळ मिळत नाही.

३. दिवा नेहमी देवाच्या फोटोसमोरच लावला गेला पाहिजे. इतर ठिकाणी दिवा लावणे योग्य मानले जात नाही.

४. तुपाचा दिवा लावण्यासाठी कापसाच्या वातीचा उपयोग करावा. तेलाचा दिवा लावण्यासाठी लाल दोऱ्याची वात वापरणे उत्तम मानले जाते.

- एखाद्या घरामध्ये नियमित दिवा लावला जात असेल अशा घरांमध्ये नेहमी सकारात्मक ऊर्जा सक्रिय राहते. दिव्याच्या धूरामुळे वातावरणातील हानिकारक सूक्ष्म कीटाणु नष्ट होण्यास मदत होते.

# भूतकाळाला निरोप द्या...

'हम जब होंगे साठ साल के, और तुम होगी पचपन की, बोलो प्रीत निभाओगी ना, तब भी अपने बचपन की....' हे काही निव्वळ हलकंफुलकं फिल्मी गाणं नाही. तारुण्यातलं प्रेम म्हातारपणापर्यंत टिकवता येणं ही दैवी देणगी आहे. कारण म्हातारपणातच स्त्री-पुरुषांना साथीसोबतीची, प्रेमाची खरी गरज असते. तरुणपणाच्या प्रेमात आकर्षणाचा आणि शारीरिकतेचा अंश असतो. त्यात काहीच गैर वा दूषणास्पद नाही. मात्र वयाबरोबर हे प्रेम परिपक्व आणि समंजस बनलं पाहिजे. म्हातारपणी एकमेकांना जपण्यासाठी, एकमेकांची काळजी घेण्यासाठी स्त्री-पुरुषांना एकमेकांची जास्त गरज असते. सात जन्मं सुख-दुःखं वाटून घेण्याची 'रोमँटिक' गोष्ट सोडून द्या; पण या जन्मीची साथसोबत निभावणं काहीच कठीण नाही.

एकमेकांशी पारदर्शी प्रामाणिक असणं आणि एकमेकांच्या भावना न दुखवता मोकळेपणानं जगणं जमलं, तर पती-पत्नी हसत हसत वृद्धापकाळ तरुण जातील. जन्मोजन्मीचं हे बंधन स्वखुषीनं निभावून न्या. त्यासाठी -

**सर्वप्रथम प्रामाणिक असा :-** प्रामाणिकपणा हा प्रत्येक नात्याचा पाया आहे. तुम्ही प्रामाणिक असाल, तर तुमचा पार्टनरदेखील तुम्हाला तसाच मनमोकळा प्रतिसाद देईल. तोही तुमच्याशी प्रामाणिक राहील.

**माणूस जसं आहे तसं स्वीकारा :-** जोडीदाराबद्दल अवास्तव अपेक्षा ठेवू नका. कुणीही माणूस परिपूर्ण नसतो. तुम्हाला सीतेसारखी पत्नी हवी असेल, तर आधी तुम्ही एकवचनी, निःस्वार्थी, सत्यप्रिय राम असायला पाहिजे. गंमत जाऊ द्या, हे अशक्यच आहे. त्याऐवजी तुमचा जोडीदार दोषांसकट स्वीकारा. त्याचा तापटपणा, हेकटपणा, उतावीळपणा, विसरभोळेपणा यांना महत्त्व देऊ नका. त्याबद्दल त्याला टोचून बोलू नका किंवा त्याची टवाळी करू नका. त्याचं तुमच्यावर प्रेम खरं आहे, अशी तुमची खात्री असेल, तर अन्य कोणत्याही गोष्टीला महत्त्व नाही.

**भूतकाळाला महत्त्व देऊ नका : -** पूर्वीच्या चुकांचा उल्लेख टाळा. दीर्घ काळ एकत्र राहताना कमी - जास्त गोष्टी घडणारच. त्या विसरण्यात खरी माणुसकी आहे. तुमच्या आयुष्यातल्या माजी मैत्रिणीचा/मित्राचा उल्लेख करून तुमच्या जोडीदाराशी तुलना करू नका. तुलना कुणालाच आवडत नाही. तिच्यामुळे आपलं माणूस अकारण दुखावलं जातं आणि मग हा कडवटपणा जाता जात नाही. भूतकाळाला कायमचा निरोप द्या. तुमचा वर्तमानकाळ महत्त्वाचा आहे. तोच जगा.

**प्रत्येक दिवस नवा समजून जगा : -** म्हातारपणा म्हणजे रोज झाडावरचं एक पान गळून पडणार - तुमच्या आयुष्यातला एक दिवस रोज कमी होणार. म्हणूनच प्रत्येक दिवस जास्तीत जास्त आनंदानं जगा. उद्याचं कुणी पाहिलंय ? त्याची चिंता करू नका.

**चूक मान्य करा :-** कुणीही मुद्दा चुका करीत नाही; पण त्या घडतातच. त्यामुळे काही बिघडत नाही. चूक मनमोकळेपणानं मान्य करावी आणि तिचा उल्लेखही टाळावा.

# मुलाखतीला जाताना योग्य ड्रेस असायला हवा

उत्तम जॉब-नोकरी मिळवण्याचं स्वप्न प्रत्येकाने बघणं स्वाभाविकच आहे. नोकरीसाठी इन्टरव्ह्यू कॉल येण्याचा अर्थ आहे तिथे मुलाखतीसाठी जात आहात त्या ऑर्गनायझेशनमधील प्रमुखांवर फर्स्ट इम्प्रेशन पाडणं !



यात तथ्य आहे कारण तुमच्यात काम कौशल्य आहेत या गोष्टी मुलाखतीच्या वेळी दुय्यम ठरतात. तुमचं व्यक्तिमत्त्व जोखलं जातं. तुमचे मॅनर्स कसे आहेत यावरून निवड करायची अथवा नाही हा निर्णय घेतला जातो. यासाठीच मुलाखतीचा दिवस हा फार महत्त्वाचा ठरतो. उतावीळपणा किंवा अव्यावसायिकपणा वागण्यातून दिसणार नाही हे अतिशय बारकाईने बघावं लागतं.

**वक्तशीर राहा -** रोजची जबाबदारी सांभाळत उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम घेतला जातो. म्हणूनच त्यांच्या वेळेला महत्त्व आहे हे ओळखा आणि मुलाखतीची वेळ पाळा. इन्टरव्ह्यूला किमान पंधरा मिनिटं आधी पोहचा.

**योग्य ड्रेस हवा -** मुलाखतीच्या शिष्टाचारांमध्ये योग्य ड्रेस असण्याला फार महत्त्व आहे. ऑर्गनायझेशन आणि कामाचं स्वरूप लक्षात घेऊन योग्य ड्रेसची निवड करा. त्यात भपकेबाजपणा नको.

**फर्स्ट हॅण्डशेक -** इन्टरव्ह्यूमधला हा सर्वात महत्त्वाचा क्षण. ठाम-ठोस हॅण्डशेकमधून हा तुमचा खुलेपणा व्यक्त होतो आणि मुलाखत घेणाऱ्यात 'वेलकम फिलींग' निर्माण होतं.

मुलाखत देताना सकारात्मक प्रतिमा निर्माण व्हायला हवी. भाषा, उत्तर देण्याची, बसण्याची ढब यातून आत्मविश्वास झळकायला हवा. आवाज स्पष्ट हवा. मुलाखत घेणाऱ्यांच्या डोळ्यात बघा.

**दोन वेळा 'थँक यू' म्हणा ! -** मुलाखतीच्या वेळी इन्टरव्ह्यूसाठी वेळ आणि संधी दिल्याबद्दल दोन वेळा जाणीवपूर्वक संधी दिल्याबद्दल दोन वेळा 'थँक यू' म्हणा. यातून तुम्हाला वेळेचं महत्त्व आहे असा संदेश त्यातून जाईल.

मुलाखतीच्या दिवशी संध्याकाळी औपचारिक आभार मानणारा ई-मेल करा. स्वत:च्या हस्ताक्षरात पत्र पाठवणं हा सर्वात चांगला पर्याय आहे.

# इतरांसमोर स्वत:च्या गुणांचा उदो उदो करू नका

प्रत्येकाची जगण्याची रीत ही न्यारी असते. प्रत्येकजण आपापल्या मनमर्जीप्रमाणे जगत असतो. पण जगत असताना इतरांपेक्षा वेगळे जगणे हे आपले असावे असे प्रत्येकालाच वाटत असते. आणि त्यासाठी त्याचा सारा खटाटोप असतो. त्याची प्रत्येक हालचाल इतरांपेक्षा आपल्यात काहीतरी वेगळेपण असावे या भावनेने प्रेरित होऊन कार्य करण्यासाठी कार्यरत होत असते. एखादा स्वत:चे आणि इतरांचे भले पहात असतो. मात्र, काही काही लोकात केवळ स्वार्थच लपलेला असतो. या स्वार्थामुळे केवळ अंधाप्रमाणे वागण्याची मनोवृत्ती अशा व्यक्तींची झालेली असते.



जगाकडे जे नाही ते माझ्याकडे आहे याची फुशारकी मारण्यातच त्यांना मोठा आनंद असतो. शेजाऱ्यांकडे दुचाकी आणली तर लगेच पोटतिडकीने दुसऱ्या क्षणी चारचाकी घेऊन येण्याची मानसिकता असणे योग्य नव्हे. स्पर्धा असावी ती स्वत:शी इतरांशी नको. पल्लवीत झालेल्या मनोभावनांचा विचार करता सर्वसामान्यांच्यामध्ये मिसळण्याची भावना जो करतो तो निश्चितपणाने यशापर्यंत पोहचतो. आपली जीवन जगण्याची रीत ही इतरांना रुचावी केवळ आपल्याच शब्दांचा त्यांच्यावरती पगडा असावा अशी मनामध्ये अपेक्षासुद्धा ठेवू नये. आणि ही ठेवल्यास आपणाला जगण्यासाठी सामर्थ्य हवे असल्यास इतराहून वेगळे असण्याची भावना मनी ठेवू नका. आजच्या जमान्यातील प्रत्येक व्यक्ती प्रसिद्धीसाठी हापापलेली आहे. प्रत्येकाला न केलेल्या कामाची आपणच केले असे सांगून उदो उदो करण्याची सवय जडलेली आहे. मात्र आपण केलेले काम हे इतरांनी केले असे जर झाले तर आपल्या मनात आकस निर्माण होतो. मात्र अशा या माणसांना स्वत:चे मोठेपण गाण्यात फार महानता वाटते. अशी माणसे कधीच नंबर वन होऊ शकत नाहीत. कारण यांच्यामध्ये असलेली उणीव ही यांना अगदी शेवटच्या टोकाला म्हणजे शून्यवत बनवेल. प्रत्येक क्षेत्रात आघाडीच्या स्थानावरती आपण असावे अशी भावना व त्यादृष्टीने प्रयत्न करणारी एक अन् एक व्यक्ती यशाच्या शिखरापर्यंत पोहचलेली दिसेल. अशा या यशस्वी व्यक्ती सदासर्वकाळ नंबर वन असतात. याच्या विरोधातच विचार करावयाच्या झाल्यास सदैव शेवटी असणाऱ्या व्यक्ती आणि त्यांची मानसिकता यांचा विचार करता या व्यक्ती सदैव पळपुटे धोरण स्वीकारुन स्वत:च्या प्रगतीचा मार्ग बंदीस्त करतात आणि आपल्या प्रगतीला खीळ घालतात म्हणजेच हे जीवनात कधीच नंबर वन होऊ शकत नाहीत. मग ते कोणते का क्षेत्र असेना त्यांचा नंबर वन कधीच होणार नाही. हे लक्षात ठेवून सदैव प्रत्येक व्यक्तीने आपली भूमिका ठामपणाने घेऊन आणि सक्षमपणाने त्याच्याशी प्रयत्न करुन इतरांची भूमिका व त्यासाठी लागणारे प्रयत्न आपण करुन त्यामध्ये बदल केल्यास आणि आपल्या वर्तनामध्ये बदल केल्यास निश्चितपणाने सक्षम अशा पद्धतीचे व्यक्तीमत्व निर्माण होण्यास वेळ लागणार आहे. अनाहूतपणाने आपण प्रथम क्रमांकावरती यावे असे वाटत असेल, तर केवळ वाटून चालणार नाही तर त्याकरिता प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागेल. आणि सदैव ध्येयाकडे लक्ष असावे लागेल. तरच आपण नंबर वन होऊ शकू अन्यथा इतरांनी कोणत्याही बाबतीत सर्वप्रथम आपला विचार करावा व आपल्याला प्राधान्य द्यावे असे प्रत्येकालाच वाटत असते.

इतरांच्या नजरेत सर्वोत्कृष्ट होऊ इच्छित असाल, तर आपण काही गोष्टींकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

इतरांसमोर स्वत:च्या गुणांचा उदोउदो करु नका. आपले टॅलेंट समोरच्या व्यक्तीला आपोआपच कळेल.

कामात व्यस्त असला, तरी थोडा वेळ आपल्या नातेवाईक, मैत्रिणी व परिजितांसाठी काढायला विसरु नका.

जुन्या मैत्रिणींना विसरु नका व नव्या मैत्रिणींसाठीही मनाची कवाडे उघडी ठेवा.

नातेवाईक व मैत्रिणींच्या सुख-दु:खात नेहमी सामील होण्याचा सतत प्रयत्न करा. तसेच आपल्या सुख-दु:खाच्या प्रसंगीही त्यांना बोलवा.

शेजारधर्म उत्तमरित्या पाळा. जर शेजारी कोणी आजारी असेल, तर त्यांना मदत करा. त्यांच्या मुलांशी प्रेमाने बोला. घरातील नोकर, दुधवाले, पेपरवाले, माळी इ. चे विचार ऐकण्याचा प्रयत्न करा. त्यांच्याशी नोकर म्हणून न वागता माणुसकीच्या नात्याने वागा. त्यांचा त्रास, आजार समजून घ्या. आपल्या समवयस्क व सहकाऱ्यांशी सहकाराने वागायला हवे. एखाद्याने आपल्यावर विश्वासून आपल्याला त्याची एखादी गुप्त गोष्ट सांगितली असेल, तर चुकूनही ती इतरांना सांगू नये. तसेच आपल्या खासगी गोष्टीही सर्वांना सांगत सुटू नये. आपला वेळ खोटे बोलण्यात व परनिंदेत घालवू नये.

उलट रिकाम्या वेळेचा सदुपयोग करावा. नेहमी हसतमुखत राहावे. घरी आलेल्या पाहुण्यांशी बोलताना तसेच फोनवर बोलताना आपल्या आवाजात आनंद दिसावा. जेणेकरुन समोरच्या व्यक्तीला वाटावे की, त्यांना भेटून आपण खरोखरच आनंदी झाला आहात. आपले व्यक्तीमत्व उठावदार कसे होईल याला महत्व द्यावे.

# जीम शक्य नसेल तर घरच्या घरी योगा करा

आजची तरूण पिढी दिवसेंदिवस वेगवान होत आहे. त्यांना आपल्या करिअरप्रमाणेच हेल्थ आणि वेल्थसुद्धा महत्त्वाचे वाटतात. इतकेच नव्हे, तर आपण स्मार्ट दिसावे यांकडेही त्यांचा कल वाढत आहे. यादृष्टीने पुढील फिटनेस फण्डे उपयुक्त ठरू शकतात.



✻ एक चिमूटभर कच्चे तांदूळ तोंडात टाकून वरून पाणी प्यावे. याने लिव्हर मजबूत राहते आणि पित्ताचा त्रास होत नाही.

✻ रात्री तांब्याच्या भांड्यात भरून ठेवलेले पाणी सकाळी उठून प्यावे. अर्धा ते एक शेर थंड पाणी प्यावे.

✻ ताडासन करावे. यासाठी आपल्याला पायाच्या दोन्ही हात वर न्यावेत.

✻ रात्रीच्या वेळी एक तोळा त्रिफळा एक पाव थंड पाण्यात भिजत ठेवावे. सकाळी हे पाणी गाळून त्याने डोळे धुवावेत व उरलेले पाणी प्यावे.

✻ मिठामध्ये मोहरीचे तेल मिसळून त्याने दात व हिरड्या साफ करावे. याने दात मजबूत तर होतातच शिवाय, पायोरियासारख्या आजारांपासूनही बचाव होतो.

✻ आपल्या क्षमतेनुसार १० ते १५ मिनिटे प्राणायाम करावा.

✻ प्राणायामानंतर आपल्या क्षमतेनुसार व्यायाम करावा. जिममध्ये जाणे शक्य नसल्यास घरच्या घरीच योगा आणि एक्सरसाईज करावे.

✻ आळसामुळे योगा आणि एक्सरसाईज करणे शक्य नसल्यास सकाळ अथवा संध्याकाळ १-२ मैल पायी चालावे.

✻ दररोज थंड पाण्याने स्नान करावे. नंतर कोरड्या टॉवेलने रगडून शरीर स्वच्छ करावे.

✻ क्षमतेनुसार सूर्यस्नान घ्यावे. याने शरीरास जीवनसत्त्व 'ड' ची प्राप्ती होईल.

✻ आठवड्यातून एक वेळा शरीराला तेलाने मालीश करावी.

✻ भोजनास जाताना हात स्वच्छ धुवावेत. तर असे हे काही फिटनेसचे हिट फॉर्म्यूले !

# जीवनसाथी सोबत मनमोकळे बोला

प्रत्येक स्त्रीला आपल्या मनाजोगा जीवनाचा जोडीदार हवा असतो, परंतु तिची ही इच्छा सहजतेने पूर्ण होत नसते. त्यासाठी तिला खूप प्रयत्न करावे लागतात. स्त्रीच्या दृष्टीने हा जीवनातील अत्यंत महत्वाचा निर्णय असतो. यासाठी आपल्या इच्छा, अपेक्षा व स्वप्नांना अनुकूल पुरुष शोधल्यानंतरच त्याला आपल्या जीवनात सामावून घ्यायला हवे. आपल्या स्वप्नातील राजकुमार सहजतेने निवडण्यासाठी येथे काही उपाय देत आहोत.

आपल्या आवडत्या पुरुषाचे मन जिंकन्यासाठी आपले संपूर्ण लक्ष त्याच्यावर केंद्रित करा. त्याचे बोलणे मन लावून ऐका.

जी वस्तू जेवढ्या सहजतेने मिळते तेवढे त्याचे महत्व कमी वाटते. प्रेमाबाबतही एका मर्यादेपर्यंत हे खरे आहे. जर आपल्याला आपले प्रेम सहजतेने मिळाले तर त्याची कदर करा. सार्थक, सकारात्मक रूपाने त्याची सहचरी व्हा. यामुळे आपण त्याच्या मनात हसून राहाल.

✻ बऱ्याचदा तो आपल्याला सहयोग देण्याच्या वा आपल्यासोबत येण्याच्या स्थितीत नसू शकतो. पण त्यामुळे नाराज, हताश होऊ नका. आपण त्याच्यासोबत राहून वेळ घालवू शकाल असा उपाय शोधा. यामुळे त्याच्या मनात आपल्याविषयी आदर व प्रेम वाढेल.

✻ आपल्या भावी जीवनसाथी सोबत मनमोकळे बोला. त्याची पसंती-नापसंती जाणण्याचा प्रयत्न करा. यामुळे उभयतांतही सुखाचे मार्ग मोकळे होतील. ते त्याच्यापासून दडवू नका. एखाद्या पुरुषाला एखादी स्त्री आपल्यावर मनस्वी प्रेम करते आहे असे कळल्यानंतर त्याच्या मनात त्या स्त्रीविषयी आदर वाढतो.

# प्रिय व्यक्तीशी नातं दीर्घकाळ टिकण्यासाठी 'हे' सिक्रेट फॉलो करा आणि सुखाने नांदा

एक गोष्ट १००% खरी आहे की आपण ज्या लोकांच्या सहवासात राहतो, त्यांचे काही गुण आपल्यात आपल्या नकळत येतात. एखादं छान आनंदात जगणारं जोडपं तुम्हाला 'Couple Goals' देऊ शकेल. नातेसंबंध कसे जोडायचे, मजबूत करायचे, कसे टिकवायचे हे तुम्ही त्यांच्याकडून शिकू शकता. आपण थेटपणे शिकत नसलो तरीही आपलं Subconscious Mind आपल्या नकळतच या चांगल्या गोष्टींची नोंद घेत असतं. त्यामुळे नतेसंबंधांत committed असताना तुमच्या आसपास अशी चांगली आणि अनुकरणीय जोडपी असतील तर उत्तम. यामध्ये वयाचा, आर्थिक स्तराचा किंवा राहणीमानाचा विचार करू नका.

नात्याकडून आपल्याला खूप अपेक्षा असतात. पुढे जाऊन चांगलं काहीतरी घडावं आणि नातं टिकून राहावं, असं वाटत असतं तेव्हा आपण समोरच्या व्यक्तीचं वाईट बोलणंही पटकन स्वीकारतो. अशा विशेष नात्यांकडून आपल्याला इतक्या जास्त अपेक्षा असतात, की छोट्या छोट्या गोष्टींवरही आपण पटकन रिॲक्ट होतो. त्यामुळे जेव्हा जेव्हा दोघांमध्ये मतभेद निर्माण होतात, तेव्हा संपूर्ण नात्याकडे तटस्थ दृष्टीकोनातून पाहणं सगळ्यात महत्त्वाचं ठरतं. तुमच्या नात्यात तुम्हाला रस असेल तर, तुमच्या जोडीदारासोबतच्या चांगल्या गोष्टी लक्षात ठेवा. कठीण प्रसंगी चांगल्या गोष्टींचा विचार करा. तुमच्या दोघांचे आनंदाचे क्षण लक्षात ठेवा. नात्यातील चुका त्या चांगल्या गोष्टींपेक्षा जास्त असू नयेत!

**मिठी हे एक औषध**

स्पर्श हा जिव्हाळ्याच्या संबंधांचा एक आवश्यक आणि महत्त्वाचा भाग आहे. शारीरिक संबंध हा प्रत्येक जिव्हाळ्याच्या नात्याचा किंवा पती-पत्नीचा किंवा गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंडचा एक भाग असतो. पण लैंगिक भावना मनात न आणता केलेला स्पर्श कधी कधी असा भावूक क्षण देतो, जो कधी 'एकत्र झोपल्यानंतरही' मिळवू शकत नाही.



**आपल्या मनातलं स्पष्ट बोला**

सगळ्याच जोडप्यांचे संबंध प्रेम, विश्वास, आत्मीयता, जिव्हाळ्याचे असतात. ते एकमेकांना समजून घेण्यासाठी उत्सुक असतात. बहुतांश मुलींना एक सवय असते, आपल्या मनात काय आहे हे स्पष्टपणे न सांगता त्या नुसत्या गप्प राहतात किंवा रडत राहतात. ही गोष्ट वारंवार होत राहिली की त्याचा समोरच्या व्यक्तीला कंटाळा येऊ शकतो. पण त्याऐवजी आपल्याला होणारा त्रास, आपली भावनिक गरज किंवा अन्य कुठलीही गोष्ट जोडीदाराशी स्पष्टपणे बोलली तर नातं जास्त समंजस होतं.

**माफी मागा माफ करा**

वाद किंवा मतभेद हे चांगल्या नात्याचं, नात्यातला संवाद जिवंत असल्याचं लक्षण आहे. मात्र भांडण झाल्यावर ते मिटवताही आलं पाहिजे. स्वतःची चूक नसतानाही पुढाकार घेऊन सॉरी म्हणण्याने नात्यात नवंच चैतन्य संचारतं. आणि त्याचवेळी दुसऱ्याची चूक पटकन पोटात घेऊन माफ करता येणं, हेसुद्धा महत्त्वाचं आहे. नातं कधीही एकांगी असू नये. एक सॉरी आणि हलकासा स्पर्श.. आणखी काही लागत नाही.

**झोपायला जा**

नाही, नाही...!! मी हे सेक्सबद्दल सांगत नाहीये! जोडप्यांमध्ये जिव्हाळ्याच्या नात्यात, नात्याच्या दीर्घायुष्यासाठी एकमेकांवरचं प्रेम दाखवण्याचा, हवहवेसे आहोत हे सांगण्याचा हा एक आवश्यक मार्ग आहे. पण इथे मी फक्त साध्या झोपेबद्दल सांगत आहे. पहिली गोष्ट म्हणजे भांडणानंतर लिव्हिंग रूममधल्या सोफ्यावर झोपण्याचा विचार करू नका! दुसरं म्हणजे, रात्री उशिरा नकोनकोसं संभाषण टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे गुड नाईट किस! माझ्यावर विश्वास ठेवा, यामुळे अनेक भांडणं न भांडताच मिटतात आणि नातं आणखी घट्ट होतं.

**रात्रीपेक्षा शहाणी सकाळ**

नात्यात पेचप्रसंग उद्भवला आणि 'चला सकाळी बोलू' म्हणत तुम्ही दोघंही झोपायला गेलात, तर सकाळपर्यंत ५०% मनातला राग आपोआपच कमी होतो. अनेकवेळा असंही घडतं की आपपसातल्या चर्चा गंभीर होत जातात किंवा गंभीर विषयांवर होत असतात. त्यामुळे रात्री उशिरा झालेल्या चर्चेचं किंवा वादाला भांडणात पर्यावसन करण्यापेक्षा आपला मुद्दा आरामात समजावून सांगा की, 'हे बघ, मी आता खूप थकलो/थकले आहे, यावर सकाळी बोलू, आता चर्चा वाढवली तर फक्त भांडण होईल.' आपलं नातं चिरकाल टिकावं असं वाटत असेल तर त्यासाठी दोन्ही बाजूनी प्रयत्न झाले पाहिजेत. नातं "Pilot Mode" वर असणं, ही एक भ्रामक कल्पना आहे. त्यामुळे दोघांनी एकत्रित भविष्याची छान स्वप्नं पहा आणि ती पूर्ण करण्यासाठी लागेल ते प्रयत्न न थकता करा.

# नाते नव्याने बहरुन जाईल, फक्त आचार्य चाणक्यांनी सांगितलेल्या ५ गोष्टींची पक्की गाठ बांधून घ्या




प्रत्येकाला आयुष्यात चांगली नाती हवी असतात. या गोष्टींसाठी माणसे अनेक प्रयत्न करतात. मग ते नाते कौटुंबिक असो किंवा व्यवसायिक नाते टिकवण्यासाठी प्रयत्न करत. जर आयुष्यातील नाती पक्की असतील तर याच्या आधारे एखादी व्यक्ती सर्वात मोठी अडचणही सहज पार करु शकते. म्हणूनच, चांगल्या नात्यांना कधीही कमकुवत होऊ देऊ नये, परंतु प्रत्येक क्षणाने त्यांना दृढ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी चाणक्य नीतीमध्ये काही नियम सांगण्यात आले आहेत. चाणक्य नीतीनुसार, एखाद्या व्यक्तीला यशस्वी होण्यासाठी चांगले संबंध महत्त्वाचे असतात. ज्या व्यक्तीमध्ये चांगले संबंध असतात, तो प्रत्येक परिस्थितीवर सहज मात करतो. जर एखाद्या व्यक्तीने या गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्याचे नाते मजबूत राहते. चला तर मग जाणून घेऊया नात्यांबद्दल चाणक्य नीती काय म्हणते.

**फसवणुक करु नका**

कोणत्याही नात्यात फसवणुक करु नका. आयुष्यात सर्व मिळणे फार कठीण असते. यासाठी एखाद्याने फसवणुकीचा अवलंब करू नये. खोटे आणि कपटाने निर्माण झालेली नाती फार काळ टिकत नाहीत. प्रत्येक नात्याचा विश्वास हा प्रेमावर अवलंबून असतो. कोणत्याही नात्यातील श्वास हा विश्वास असतो. त्यामुळे नात्यातील विश्वास कमी होऊ देऊ नका.

**नम्रता ठेवा**

चाणक्य नीतीनुसार ज्या व्यक्तीच्या बोलण्यात मृदुता असते आणि वागण्यात नम्रता असते तेव्हा तो व्यक्ती सर्वांना प्रिय असतो. तुमचे बोलणे सर्वांचे मन जिंकून घेते. त्यामुळे वागण्यात नम्रता आणा त्यामुळे तुमचे नाते घट्ट होण्यास देखील मदत होईल.

**नात्यात अहंकार आणू नका**

अहंकार हा एक असा दोष आहे, ज्यामुळे मजबूत नात्यातही तडा जावू शकतो. त्यामुळे अनेक नाती बिघडतात. चाणक्या नीतीनुसार माणसाचा अहंकार इतका मोठा होऊ नका की त्यापुढे तुमचे नाते देखील फिके पडेल.

**प्रतिष्ठा राखा**

कोणत्याही नात्याची प्रतिष्ठा तेव्हाच असते जेव्हा एकमेकांबद्दल आदर करतो. प्रत्येक नात्याची प्रतिष्ठा राखणे खूप महत्वाचे आहे. त्यामुळे दुसऱ्याचा अपमान करु नका.जी व्यक्ती अहंकाराचा त्याग करून सर्वांचा आदर करते, अशा व्यक्तीबद्दल जोडीदाराच्या मनात प्रेम निर्माण होते.

**प्रामाणिकपणा**

प्रत्येक नात्यात प्रामाणिकपणा खूप महत्त्वाचा असतो. खोट्या गोष्टी सांगून तुम्ही क्षणीक आनंद मिळवू शकता पण असे नाते फार काळ टिकत नाही. त्यामुळे कोणत्याही नात्यात प्रामाणिकपणा कायम ठेवा.

**टीप :** या लेखात देण्यात आलेली माहिती, सूचना आणि मान्यता ही उपलब्ध सामान्य माहितीवर आधारित आहे.

# ऑफिसमध्ये या गोष्टी पाळा

ऑफिसात आपण आपले वर्क स्वेशन (डेस्क, कॉम्प्युटर इ.) किती स्वच्छ ठेवता यावर आपल्या करिअरचा विकास बराच अवलंबून असतो. एवढेच नव्हे तर ऑफिसात आपली लोकप्रियता वाढणे, घटणे हेही यावरच अवलंबून असते.

ऑफिस सच्छ राखण्याचे अनेक फायदे आहेत. एक तर यामुळे आपले सर्वांशी घनिष्ट व मधुर संबंध राखले जातात. तसेच आपल्या कामात परफेक्शन येते.

आपण स्वच्छ, नीटनेटके दिसाल, तर प्रत्येकाला आपल्याला भेटून आनंद होईल. ऑफिसात चुरगळलेले कपडे घातलेल्या व अस्वच्छ चेहरा असलेल्या माणसांना कोणी भेटू इच्छित नाही.

आपल्या शेजारी बसलेला कर्मचारी बॉसकडे आपल्याविषयी तक्रार करतो, अशी वेळ आपल्यावर येऊ देऊ नका.

आपल्या टेबलावर व कॉम्प्युटरवर अस्ताव्यस्तपणा आणि अराजकता नसावी. आपल्या सहकर्मचाऱ्याला तेथे येऊन आपल्याशी बोलावेसे वाटावे असे ते असावे.

आपल्या कामातही सफाई असावी. केलेले काम बॉसकडे देण्यापूर्वी त्यावरुन एक नजर फिरवावी. त्यामुळे बॉससुद्धा खूश राहिल. अन्यथा त्याच्या त्रागाला आपल्याला सामोरे जावे लागेल. कोणत्याही ऑफिसात उत्तम कार्यशैलीचे कौतुक होते. अशा कार्यशैलीसाठी हवी स्वच्छता. व्यक्तीमत्वाच्या विकासामुळेच परफेक्शनचे कोडे सुलभपणे सोडविता येते.

कुठल्याही कंपनीत किंवा सार्वजनिक ठिकाणी वापरताना व्यक्तीमत्व महत्वाचे ठरते. त्यात नीटनेटकेपणा असेल तर स्वत:ची छाप पडते. कार्यशैलीचे गोडवे गायले जातात.

# उन्हाळ्याच्या गरमीत किचन ठेवा अगदी गारेगार! 'या' सोप्या टिप्स करा फॉलो

गरमी इतकी वाढली आहे की कूलर किंवा एसीशिवाय आता एक मिनिटही राहवत नाही. विशेषतः, हा ऋतू महिलांसाठी खूप वेदनादायक असतो, कारण त्यांना दिवसरात्र किचनमध्ये जेवण बनवावे लागते. उन्हाळ्यात, किचनमध्ये कोणालाही जायची इच्छा होत नाही, परंतु घरातली आई घरच्यांना चांगला चुंगला स्वयंपाक करून देण्यासाठी किचनमध्ये राबत असते.



आता आपण अन्नाशिवाय तर राहू शकत नाही आणि या महागाईत आपण दररोज बाहेरून अन्न मागवू शकत नाही. अशा परिस्थितीत, महिला इच्छा नसतानाही स्वयंपाकघरात जातात. तासनतास गॅसजवळ उभे राहून स्वयंपाक केल्यानंतर त्या घामाने पूर्णपणे भिजतात. आजकाल, किचनदेखील एका भट्टीप्रमाणेच तापलेलं असतं. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला किचन थंड राहावे आणि किचनमध्ये स्वयंपाक करताना घाम येऊ नये असे वाटत असेल, तर या टिप्स नक्की वापरून पाहा.

**उन्हाळ्यात तुमचे किचन अशा प्रकारे ठेवा थंड**

जर तुम्हाला स्वयंपाकघरात उष्णता टाळायची असेल तर सकाळीच सर्व जेवण तयार करा. अनेक महिला ११ ते १ च्या दरम्यान दुपारचे जेवण बनवतात. १० वाजल्यानंतर सूर्याची तीव्रता वाढते. जर तुम्ही दुपारी जेवण बनवायला गेलात तर तुम्हाला नक्कीच प्रचंड उष्णता जाणवेल. नाश्ता केल्यानंतर, जेवणही तयार करा, विशेषतः ज्या गोष्टींना जास्त वेळ लागतो, त्या तयार ठेवा.

जास्त वेळ घेणाऱ्या गोष्टी बनवू नका. उन्हाळ्यात, कमी तेल आणि कमी मसाले वापरून जेवण बनवून खावे. असे काहीतरी बनवा की तुम्हाला तासन्तास स्वयंपाकघरात उभे राहावे लागणार नाही.

तुम्हाला जमत असल्यास, तुम्ही आदल्या रात्री काही गोष्टी करू शकता जसे की पीठ मळणे, भाज्या चिरणे आणि त्या तयार ठेवणे. मसाले बारीक करणे. तथापि, तुम्हाला थोडे वेळेचे व्यवस्थापन करावे लागेल. अशा परिस्थितीत, जर तुम्ही दिवसा स्वयंपाक करायला गेलात तर कमी वेळ लागेल. जर तुम्ही जास्त वेळ स्वयंपाकघरात राहिलात तर घामासोबतच शरीरातील ऊर्जाही निघून जाईल.

जर तुमच्या स्वयंपाकघरात मोठ्या खिडक्या असतील तर त्या दिवसा बंद ठेवा आणि हलक्या रंगाचे कॉटन पडदे लावा. स्वयंपाकघरात जागा असल्यास, कूलिंग प्लांट बसवा. हिरवीगार झाडे पाहून तुमचे मनही थंड वाटेल. रात्री खिडक्या उघड्या ठेवणे ठीक आहे. यामुळे हवा सतत हवेशीर राहील.

काही लोकांच्या स्वयंपाकघरात चिमणी आणि एक्झॉस्ट फॅन बसवलेले असतात पण ते त्याचा वापर करत नाहीत. जर तुमच्या स्वयंपाकघरात या सर्व सुविधा असतील तर उन्हाळ्यात त्यांचा वापर नक्कीच करा. यामुळे केवळ धूरच नाहीसा होईल असे नाही तर आर्द्रता देखील कमी होईल. शरीर कोरडे राहील.

# घरातील गोपनीय गोष्ट लपविणेही एक कला

महिलांच्या पोटात काहीही पचत नाही असे म्हणतात. महिलांना हे खटकले असेल, पण बऱ्याच अंशी हे खरे आहे. बहुतेक महिला कोणतीही गोष्ट पचवू शकत नाहीत व ती दुसऱ्याला फुगवून सांगितल्याशिवाय त्यांनी शांती मिळत नाही. आवेशात व आग्रहापोटी लोक एखादी गुप्त गोष्ट इतरांना सांगतात. एखादे गुपीत वा सीक्रेट म्हणजे सांगणाऱ्या व्यतिरिक्त इतर कोणालाही माहीत नसणारी गोष्ट ज्याने ती आपल्याला सांगितलेली असते त्याने आपल्यावर खूप विश्वासून ती सांगितलेली असते. कदाचित त्या गुपीताशी त्याचा जवळचा संबंध असल्यामुळे ते गुपीत गुपीत राहणेच योग्य असते. जेव्हा एखादा आपल्याला एकादे गुपीत सांगत असतो तेव्हा तो आपल्याकडून एखादे उत्तर वा सल्ला मिळवू इच्छित असतो. बऱ्याचदा एखाद्या गुपीताचे ओझे न पेलता आल्यामुळेही आपल्याला सांगितले जाते. यासाठी नैतिकतेच्या दृष्टीने कोणाचेही गुपीत एखाद्या तिऱ्हाईत व्यक्तीला सांगू नये. जर खरोखरच एखाद्याने गुपीत तिऱ्हाईत व्यक्तीला सांगू इच्छित असाल, तर त्यासाठी एखादे खास कारण आपल्याकडे असायला हवे. अन्यथा त्याचे परिणाम भोगायलाही आपल्याला तयार राहावे लागेल. असे केल्यामुळे आपल्याला लाजिरवाणे वा बदनामही व्हावे लागू शकते. काही वेळा एखाद्याचा विश्वास तोडून त्याचे गुपीत इतर व्यक्तीला सांगणे ही गरजेचे होते. विशेषत: ते गुपीत सांगितल्यामुळे एखादा मोठा त्रास टळत असेल तर.हल्लीच्या काळात कोणावरही सहजासहजी विश्वास टाकणे कठीण आहे. समजा आपण एखाद्यावर विश्वास ठेवून आपले एखादे गुपीत सांगितले, तर तिरहाईताला सांगितले.


## राजकीय पक्ष नोंदणी बाबत
## जाहीर सूचना

मी अर्जदार **श्रीमती संगीता विष्णू ढसाळ** या जाहीर सूचनेद्वारे असे घोषित करतो/करते की, दलित पँथर या नावाने राजकीय पक्ष नोंदणीसाठी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे आम्ही अर्ज केला आहे. या पक्षाचे मुख्य कार्यालय **पुणे जिल्हा, तालुका शिरूर, केंदुर-४१३४०३. मिळकत क्रमांक ९५४/२** या ठिकाणी असेल. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ या आदेशानुसार पक्षाच्या नोंदणीसाठी अर्ज केला आहे. या राजकीय पक्षाचे महाराष्ट्र राज्यातील पदाधिकारी खालीलप्रमाणे आहेत:

**अध्यक्ष : श्रीमती संगीता विष्णू ढसाळ.**
**सचिव : श्रीमती रेणुका सुरेश ढसाळ.**
**कोषाध्यक्ष/खजिनदार : श्री स्वप्निल अरुण ढसाळ**

जर कोणाला दलित पँथर या राजकीय पक्षाच्या नोंदणीबाबत आक्षेप असल्यास, तो १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मुंबई-४०० ०३२ यांच्याकडे परस्पर नोंदवावा. त्यात आपला संपर्काचा अचूक पत्ता, दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे.

**श्रीमती संगीता विष्णू ढसाळ**
**अर्जदार**


# सदू,वाघ आणि दुकानदार

एका गावात सदू नावाचा एक गरीब माणूस राहत होता. गावातील लोकांच्या घरात व शेतात पडेल ती कामे करुन तो पोट भरत असे. एकदा गावात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सदूला कोठेच काम मिळाले नाही. उपासमारीला कंटाळून त्याच्या मनात आत्महत्येचे विचार घोळू लागले. तो भटकत भटकत गावाजवळच्या जंगलात शिरला.

जंगलाच्या मध्यभागी पोहोचला. तेव्हा अचानक त्याच्या समोर एक वाघ उभा राहिला. वाघाला पाहून ही सदूला भीती वाटली नाही. कारण तसेही आपण मरणारच आहोत तर या वाघाची भूक भागवूनच का मरु नये असे त्याला वाटले. तो वाघासमोर गेला. आपली सारी कर्मकहाणी सांगून तो स्वत:च वाघालाच मला खा असे म्हणून डोळे मिटून त्याच्यासमोर उभा राहिला.

बराच वेळ झाला तरी वाघ आपल्याला खात नाही हे पाहून सदूने डोळे उघडले. पाहतो तर समोर वाघाच्या जागी एक दैदिप्यमान देवी उभी होती. ती सदूला म्हणाली, 'सदू, मी वनदेवता आहे. तुझी कहाणी ऐकून माझे मन द्रवले आहे. हे घे धन आणि सुखाने राहा.' तिने सदूला दहा हजार सुवर्णमुद्रा दिल्या. सदू वनदेवीला नमस्कार करुन घरी परतला.

दुसऱ्या दिवशी तो एक सुवर्णमुद्रा घेऊन गावातील दुकानदाराकडे गेला. सदूच्या हातात सुवर्णमुद्रा पाहून दुकानदाराला नवल वाटले. तुला ही कुठे मिळाली असे दुकानदाराने विचारल्यानंतर सदूने सारी हकीकत त्याला सांगितली. दुकानदार श्रीमंत होता पण आपणही अशा सुवर्णमुद्रो मिळवायच्या असे त्याने ठरविले. त्याने फाटकेतुटके कपडे घातले आणि तो जंगलात गेला. जंगलाच्या मध्यभागी पोहोचताच त्याच्यासमोर वाघ आला. ही नक्कीच वनदेवी असणार असे वाटून दुकानदाराने आपली खोटी कर्मकहाणी सांगून मला खाऊन टाक असे सांगितले व डोळे मिटून घेतले. वाघाने सरळ त्याच्यावर हल्ला चढवला आणि त्याला जखमी केले. नंतर वाघ म्हणाला, 'हे लोभी दुकानदारा मी तुला ओळखले आहे.

# देव आपल्यासोबत असताना पदोपदी मिळतात

कधी कधी आयुष्यात अशी वेळ येते, जेव्हा सगळं आपल्याविरुद्ध घडतंय असं वाटतं. जवळचे माणसे साथ सोडतात, परिस्थिती हाताबाहेर जाते आणि प्रत्येक पावलावर निराशा वाटू लागते. अशा कठीण प्रसंगी मनात एकच आशा उरते – ती म्हणजे देव. ज्याच्यासाठी कोणताही आधार नाही, त्याच्यासाठी देव हा शेवटचा आणि खरा आधार ठरतो. पण एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी – देव फक्त श्रद्धेवर नव्हे, तर आपल्या कृतींवरही कृपा करतो. आपले कर्म, आपली अंतःकरणाची शुद्धता आणि निस्वार्थी भाव हीच देवाची कृपा मिळवण्याची खरी पात्रता ठरते.

प्रेमानंद जी महाराज यांच्या प्रवचनांमध्ये सांगितल्याप्रमाणे, देव जेव्हा आपल्या सोबत असतो, तेव्हा तो आपल्याला काही सूक्ष्म पण प्रभावी संकेत देतो. हे संकेत फार साधे वाटू शकतात, पण त्यांच्यामागे मोठा आध्यात्मिक अर्थ दडलेला असतो. जेव्हा हे संकेत आपल्या आयुष्यात दिसू लागतात, तेव्हा समजून घ्यावं की देव खऱ्या अर्थाने आपल्यासोबत आहे.


## राहुरी नगरपरिषद, राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर
## जाहीर निविदा सुचना

जा.क्र. कावि०९/२७५/आरोग्य/२०२६ दिनांक ०६/०५/२०२६

राहुरी नगरपरिषद निधीतुन खालील कामे हाती घ्यावयाचे आहे. त्यासाठी स्थानिक दुकानदार/अनुभवी मक्तेदार यांचे कडुन खालील कामाची निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | नग संख्या | फॉर्म फी | निविदा इसारा | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | छोटया गल्ली बोळांमध्ये ढकल हातगाडी बनविणे, ०४ डस्टबिन सह पुरवठा करणे. | नग ०२ | २०० | ५०० | एक महिना |
| | FSTP प्रकल्पासाठी लोखंडी बोर्ड २X३ चे बोर्ड पेंटींग सह पुरवठा करणे | नग ०४ | | | |
| | घनकचरा प्रकल्प येथे पत्ता टाकण्यासाठी २X३ साईजचा बोर्ड पेंटींग सह पुरवठा करणे | नग ०१ | | | |
| | घनकचरा प्रकल्प येथे वेट वेस्ट, ड्राय वेस्ट, C & D बोर्ड, डोमेस्टीक हजार्ड, सायंटिक लॅडफिल प्रोसेसिंग फलो चार्ट साठी ४ X३ चे बोर्ड पेंटींग सह पुरवठा करणे | नग ०७ | | | |
| २ | शहरातील वाळु, दगड, मातीचे ढिगारे उचलणे बाबत. | | २०० | १००० | एक वर्ष |

नियम व अटी

१. निविदा फॉर्म दि.०७/०५/२०२६ ते दि.१३/०५/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारल्या जातील. २. मोहोरबंद निविदा दि.१३/०५/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नागरी सुविधा केंद्रात स्विकारल्या जातील.
३. शक्य झाल्यास प्राप्त निविदा मा. मुख्याधिकारी साहेब यांच्या दालनात किंवा मे. सभेत निविदा धारक किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडल्या जातील.
४. इतर अटी व शर्ती नगरपरिषदेत पहावयास मिळतील. त्याची माहिती घेऊन निविदा सादर करावी.
५. निविदे संदर्भात सविस्तर माहिती नगरपरिषदेच्या आरोग्य विभागात समक्ष मिळेल.
६. बिलातुन आयकर व इतर शासकीय कर कपात केले जातील.
७. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे हक्क नगरपरिषदेने राखुन ठेवले आहे

सही/-
मुख्याधिकारी
राहुरी नगरपरिषद राहुरी



पुणे महानगरपालिका

## पुणे महानगरपालिका, पुणे
निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग
निविदा जाहिरात-नविन कामे

पुणे Pune अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दि :-०७-०५-२०२६ सकाळी ९.०० ते १६-०५-२०२६ दुपारी १४.३० पर्यंत.
स्वीकृती दिनांक :-०७-०५-२०२६ सकाळी ९.०० ते १६-०५-२०२६ दुपारी १४.३० पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :- १८-०५-२०२६ दु.३.००वा.

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु | अंदाजित पूर्व गणित रक्कम रु | बयाणा रक्कम रु | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WTAER_SUPPLY/2026/40 | पाणी पुरवठा | प्रभाग क्र.३९ मधील अप्पर-इंदिरानगर येथील गणेश नगर परिसरातील दुषित पाणीपुरवठा होणा-या पाण्याच्या लाईन बदलणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | रु.६०७९/- | रु.५५०८४१५/- | रु.५५०८४/- | ८ | विज्ञान गायकवाड ९८६०२८२७०५ |
| PMC/WTAER_SUPPLY/2026/41 | पाणी पुरवठा | प्रभाग क्र.३९ मधील सुप्पर-इंदिरानगर येथील सुवर्णयुग मित्र मंडळ ,व्ही आय टी शाळा बी ७४ बी ८२ चाळ परिसरातील दुषित पाणीपुरवठा होणा-या पाण्याच्या लाईन बदलणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | रु.६०७९/- | रु.५१७३४१५/- | रु.५९७३४/- | ८ | विज्ञान गायकवाड ९८६०२८२७०५ |
| PMC/WTAER_SUPPLY/2026/42 | पाणी पुरवठा | प्रभाग क्र.३९ मधील अप्पर-सुप्पर येथील न्यु पद्मावती नगर, शेळके वस्ती, अण्णाभाऊसाठे नगर, शिवराय नगर, परिसरातील दुषित पाणीपुरवठा होणा-या पाण्याच्या लाईन बदलणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | रु.६०७९/- | रु.५९३१९७२/- | रु.५९३२०/- | ८ | विज्ञान गायकवाड ९८६०२८२७०५ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असुन सदर कामाच निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृत सदर वेबसाईटवरुन फ्क्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असुन सर्व निविदा दोन पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन न झाल्यास याची जबाबदारी टेंडरदाराची राहील
क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपुर्ण माहिती/प्रशिक्षण टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा.येथे मिळेल.
ड) कर्यालयीन आदेश क्र. अतिमआ(वि)३२,दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

जाहिरात क्र. : २/९२
दिनांक :- ०६/०५/२०२६

सही/-
टेंडर लिपिक
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

सही/-
Nitin Khude (Prabhari)
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

## कलाविश्व

### भारतातील सर्वात मोठे प्रादेशिक ओटीटी व्यासपीठ 'स्टेज' मराठीत दिमाखात दाखल!




भारतीय सिनेसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हे मराठी असल्याने अभिजात दर्जा लाभलेली मराठी भाषेतील सिनेसृष्टीला सिनेमांचे माहेरघर मानले जाते. राष्ट्रीय–आंतराष्ट्रीय पातळीवरील विविध पुरस्कार सोहळ्यांमध्ये मराठी मनोरंजन विश्वाचा डंका वाजला असून, मराठी सिनेमांनी जागतिक पातळीवरही आपला वेगळा ठसा उमटवला आहे. सध्याच्या डिजिटलच्या युगात मराठी प्रेक्षकांनाही डिजिटल मनोरंजनाची सवय लागलेली असताना सध्याच्या ओटीटी प्लॅटफॅार्मवर दर्जेदार मराठी कॉंटेंट उपलब्ध होत नसल्याची खंत रसिकांकडून व्यक्त होत आहे. जणू त्यावर रामबाण उपाय बनून भारतातील सर्वात मोठे प्रादेशिक ओटीटी व्यासपीठ 'स्टेज' मराठीत दिमाखात दाखल झाले आहे.

अंधेरीतील वेदा कुणबा थिएटरमध्ये 'स्टेज' मराठीची अधिकृत घोषणा करण्यात आली. या सोहळ्याला 'स्टेज'चे सह–संस्थापक प्रवीण सिंघल, स्टेज ओटीटी मराठी कन्टेन्ट हेड राजेश पाठक तसेच मराठी मनोरंजन विश्वातील दिग्गज कलाकार, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ उपस्थित होते. कलाकारांच्या मांदियाळीत अनंत महादेवन, चिन्मय मांडलेकर, क्षितीज दाते, श्रेया बुगडे, उर्मिला जगताप, पुष्कर जोग, निशा परुळेकर यांसारख्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा समावेश होता. यावेळी 'स्टेज' मराठीवर दाखवल्या जाणाऱ्या मराठी कलाकृतींची घोषणाही करण्यात आली. 'स्टेज' हे केवळ एक ओटीटी प्लॅटफॅार्म नसून, ही एक क्रांती असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. २०१९ मध्ये स्थापन झालेले 'स्टेज' हे भारतातील पहिले बोलीभाषा आधारित ओटीटी प्लॅटफॉर्म आहे. हरयाणवी, राजस्थानी, भोजपुरी आणि गुजराती भाषेत यशस्वी क्रांती केल्यानंतर, 'स्टेज' आता कोट्यावधी मराठी प्रेक्षकांना त्यांच्या मातीतील, त्यांच्या बोलीभाषेतील दर्जेदार आणि कौटुंबिक आशय देण्यासाठी कटिबद्ध आहे.

'स्टेज'चे सह–संस्थापक प्रवीण सिंघल म्हणाले की, आम्ही मराठीत प्रवेश करीत असल्याचा खूप आनंद आहे. कोसाकोसावर पाणी आणि वाणी बदलत जाते. आपल्याला बोलीभाषेतून गोष्टी सांगायला, पाहायला आणि ऐकायला आवडतात. घरी जेव्हा आपण कुटुंबियांसोबत बोलतो तेव्हा कोणताही आडपडदा नसतो. अशाच प्रकारे कोणताही आडपडदा न ठेवता जेव्हा रसिकांशी भेट घेतली जाते तेव्हा त्यात एक आपलेपणा जाणवतो. आपल्या संस्कृतीसाठी काहीतरी करायला हवे या विचारातून आम्ही 'स्टेज'ची स्थापना केली. इतर भाषांमध्ये यशस्वी झाल्यानंतर मराठीपर्यंत पोहोचण्याचा 'स्टेज'चा प्रवास खूप संघर्षमय आहे. मागील पाच–सहा वर्षांपासून आमच्या गाठीशी खूप मोठा अनुभव जमा झाला आहे. मराठीमध्ये विपुल कलासंपदा आहे. इथे दरवर्षी खूप मोठ्या प्रमाणात चित्रपट बनतात. रसिक ते आवडीने पाहतात. अशा सिनेसृष्टीला आता 'स्टेज'च्या अनुभवाचा फायदा होणार आहे. मराठी सिनेमा आम्हाला घरोघरी पोहोचवायचा आहे. १ मेपासून 'स्टेज' सुरू झाले असून, लवकरात लवकर मराठी रसिकांनी याचे सबस्क्रीप्शन घ्यायला हवे असे आवाहनही प्रवीण सिंघल यांनी केले.

### 'दृश्य-अदृश्य' १९ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रभर सिनेमागृहांमध्ये होणार प्रदर्शित...




काही चित्रपट आपल्या आशयघन कथानकामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवतात, तर काही कलाकारांच्या अभिनयाच्या बळावर रसिकांवर मोहिनी घालतात. 'दृश्य–अदृश्य' हा आगामी मराठी चित्रपट विविध वैशिष्ट्यांमुळे सर्वांचे लक्ष वेधत आहे. उत्कंठावर्धक शीर्षकामुळे या चित्रपटाबाबतची उत्सुकता अगोदरच शिगेला पोहोचली असताना नुकतेच 'दृश्य–अदृश्य' चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. १९ जून रोजी हा चित्रपट संपूर्ण महाष्ट्रातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. ५६व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव म्हणजेच 'इफ्फी'मध्ये 'दृश्य–अदृश्य' चित्रपटाने जागतिक पातळीवरील प्रेक्षकांचे लक्ष वेधण्यात यश मिळविले. त्यामुळे या चित्रपटाची चहूबाजूला चर्चा रंगली. आता पोस्टर प्रदर्शनामुळे हा चित्रपट पुन्हा लाइमलाईटमध्ये आला आहे. आरएसटी कॅनव्हास निर्मित दृश्य–अदृश्य' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाची निर्मिती प्रद्योत पेंढारकर, अनिल वर्खडे, दत्ताजी थोरात, धनंजय थोरात, पृथ्वीराज खेडकर, युवराज खेडकर आणि अश्विनी खेडकर यांनी केली आहे. मिलिंद लेले यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. मराठी सिनेसृष्टीसेबतच हिंदी फिल्म इंडस्ट्रीमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणारी अभिनेत्री पूजा सावंत या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. प्रदर्शित करण्यात आलेल्या पोस्टरवरील पूजा सावंतचा चेहरा रसिकांच्या मनाची घालमेल करतो. तिच्या चेहऱ्यावरील भाव 'दृश्य–अदृश्य'बाबतची उत्सुकता वाढविण्याचे काम करीत आहेत. दृश्य आणि अदृश्य यांच्यामधे एक पुसटशी रेषा असते, जी कधीच दिसत नाही, पण त्यात खूप काही दडलेले असते. या चित्रपटातील 'दृश्य–अदृश्य'मध्येही असेच काहीसे गुंतागुंत निर्माण करणारे कोडे दडलेले असावे याची जाणीव पोस्टर पाहिल्यावर होते. डोळ्यांना दिसणारे आणि सत्य यांच्या संभ्रमात गुरफटवून ठेवणारी 'दृश्य–अदृश्य'ची पटकथा क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी आहे. वास्तव आणि भ्रम याच्यातील सीमारेषा धूसर होत गेल्या की सत्याचे दृश्य' किती अदृश्य' होते, हे प्रभावीपणे दाखवण्यात आले आहे. पोस्टरवर पूजाच्या मागच्या बाजूला पोलिसी गणवेशात अशोक समर्थ आहे. एकूणच हे पोस्टर चित्रपटाबाबत कुतूहल निर्माण करणारे आहे.'दृश्य–अदृश्य'च्या दिग्दर्शनासोबतच कथा–पटकथा लेखनही मिलिंद लेले यांनी केले असून, पूजा सावंतसोबत अशोक समर्थ, सुव्रत जोशी, हार्दिक जोशी, अक्षया गुरव, विद्याधर जोशी, केया इंगळे आदी कलाकार आहेत.

# जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### जायकाकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही एमेडिकल केअर सिस्टम' मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषत: राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम एण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत–जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल .त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.एकूणच, जायका आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील ही प्रस्तावित भागीदारी आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# नवी दिल्लीत श्री सिया रामलीला कमेटीकडून संस्थेच्या ब्रॅंड ॲम्बेसेडरपदी गुरुमितसिंग शेरा



### सनी आर्य उर्फ तहलका यांची चेअरमनपदी नियुक्ती

जनप्रवास । वृत्तसंस्था

नवी दिल्ली (द्वारका) : सांस्कृतिक व धार्मिक परंपरा जपणाऱ्या श्री सिया रामलीला कमेटी, द्वारका (नवी दिल्ली) यांनी यंदाच्या वर्षासाठी संस्थेच्या कामकाजाला नवे बळ देण्यासाठी महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. संस्थेच्या ब्रॅंड ॲम्बेसेडरपदी बॉलिवूड सेलिब्रिटी गुरमितीसिंग शेरा यांची निवड करण्यात आली असून, त्यांच्या लोकप्रियतेचा व प्रभावाचा उपयोग संस्थेच्या उपक्रमांच्या प्रसारासाठी होणार आहे. यासोबतच, बिग बॉसचे स्पर्धक आणि बॉलिवूड सेलिब्रिटी म्हणून ओळखले जाणारे सनी आर्य उर्फ तहलका भाई यांची संस्थेच्या चेअरमनपदी नियुक्ती करण्यात आली आहे.




या नियुक्त्यांच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष आदेश वालिया यांनी दोन्ही मान्यवरांना सप्रेम नियुक्तीपत्र प्रदान केले. या वेळी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. ही माहिती संस्थेचे महामंत्री कौशल शर्मा यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

# येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू होणाऱ्या सहावीच्या नवीन अभ्यासक्रम आराखड्याला मंजुरी : मंत्री दादाजी भुसे

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या नवीन अभ्यासक्रम आराखड्याला मंजुरी दिल्यानंतर राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमासाठीच्या राज्यस्तरीय सुकाणू समितीने इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रम आराखड्याला मंजुरी दिली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.



शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रम आराखड्याला मंजुरी देण्यात आली. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह, राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे (एससीईआरटी) संचालक डॉ.हेमंत वसेकर, बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक, शिक्षण संचालक (माध्यमिक) महेश पालकर, शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांच्यासह सुकाणू समितीचे सदस्य उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, येत्या जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रापासून दुसरी, तिसरी आणि चौथीसोबतच सहावीचाही नवीन अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार काठिण्यपातळी निश्चित करुन अध्ययन निश्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम आराखडा ठरविण्यात आला आहे. यास राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यानंतर या प्रारूपाला शालेय शिक्षण आयुक्तांकडे असलेल्या अभ्यासक्रम समन्वय समितीकडून मंजुरी मिळाल्यानंतर त्यासाठीची पाठ्यपुस्तके बालभारतीकडून तातडीने तयार करून ती येत्या शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीपर्यंत उपलब्ध करुन दिली जातील.दुसरी, तिसरी आणि चौथीच्या अभ्यासक्रम आराखडे आणि त्यासाठीच्या पाठ्यपुस्तकांवरील शिकवणी आदींसाठी एससीईआरटीतर्फे राज्यातील मुख्य प्रशिक्षण याच महिन्यात आयोजित करण्यात आले आहे. त्यांनतर जिल्हास्तरावरील शिक्षकांचे प्रशिक्षण असे प्रशिक्षणाचे टप्पे पूर्ण केले जाणार आहे.

# सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न समन्वयातून सोडविणार : मंत्री मकरंद जाधव-पाटील

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाने गतीने कार्यवाही करावी तसेच यामध्ये समाविष्ट रा इतर ज्याकडील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा करावा असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी दिले.

मंत्रालय येथील दालनात सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या बैठकीत मंत्री जाधव–पाटील बोलत होते. बैठकीला आमदार आमश्या पाडवी, नर्मदा बचाव आंदोलनाच्या ड. लतिका राजपूत, चेतन साळवे, पुन्या वसावे, लोक संघर्ष समितीच्या प्रतिभा शिंदे, अवर सचिव बाळासाहेब हजारे, नंदूरबारचे अतिरिक्त जिल्हाधिकारी धनंजय गोगाटे, नंदूरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होत्या.मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील म्हणाले की, शासन निर्णयानुसार पात्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करावे, टापू सर्वेक्षणातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, सरदार सरोवर प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रात ड्रोन सर्व्हेक्षणामध्ये नव्याने आढळून आलेल्या शेतजमिनीचे भुसंपादन करणे, प्रकल्पग्रस्तांच्या सिंचन सुविधांचा प्रश्न, नागरी सुविधांचा प्रश्न याबाबत त्वरीत कार्यवाही करावी. महाराष्ट्राचे प्रकल्पबाधीत ज्यांचे गुजरात मध्ये पुनर्वसन झाले आहे त्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत गुजरात प्रशासनाशी संपर्क साधून समन्वयातून प्रश्न सोडविण्यात यावेत.

# कामगार चळवळीसमोर अस्तित्वाची लढाई महत्त्वाची : ॲड. एस. के. शेट्ये

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांमुळे कामगारांनी गेल्या शंभर वर्षांच्या संघर्षातून मिळवलेले हक्क धोक्यात आले असून, कामगार चळवळीसमोर आता अस्तित्वाची लढाई उभी ठाकली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कामगार नेते ॲड. एस. के. शेट्ये यांनी केले.



मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचा १०६ वा वर्धापन दिन ४ मे रोजी माझगाव येथील कामगार सदन सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. शांती पटेल व इतर कामगार नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. शेट्ये म्हणाले की, विविध कामगार कायद्यांचे चार लेबर कोडमध्ये रूपांतर करून केंद्र सरकारने कामगारांचे अनेक हक्क कमी केले आहेत. कामगार कायदे अस्तित्वात येण्यापूर्वी ३ मे १९२० रोजी बी.पी.टी. एम्प्लॉईज युनियनची स्थापना झाली. पोर्ट उद्योगातील ही सर्वात जुनी कामगार संघटना आहे, असे त्यांनी सांगितले.

गोदी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, आतापर्यंत दोन कामगार मेळावे घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. गिरणी कामगारांप्रमाणे गोदी कामगारांनाही घरांसाठी संघर्ष करावा लागेल, असेही ते म्हणाले.

युनियनचे जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या ऐतिहासिक आंदोलनामुळे केंद्र सरकारला कायदे मागे घ्यावे लागले. त्याचप्रमाणे चार लेबर कोडविरोधातही आंदोलन सुरू असून, केंद्रीय कामगार संघटनांच्या आंदोलनात गोदी कामगारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

१ जानेवारी २०२२ पासून लागू झालेल्या वेतन कराराची पूर्ण अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने २१ मे २०२६ रोजी देशातील प्रमुख बंदरांमधील गोदी कामगार दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत निदर्शने करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

कार्यक्रमात डॉ. यतीन पटेल, प्रदीप नलावडे, दत्ता खेसे, विद्याधर राणे, विजय रणदिवे, मनीष पाटील, विकास नलावडे, रमेश कुऱ्हाडे, मारुती विश्वासराव आणि छाया कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. कामगार एकजुटीचा विजय असो आणि हम सब एक है या घोषणांनी सभेची सांगता झाली.

# राज्यपालांच्या पुढाकाराने मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये टीबी मुक्त भारत' अभियान राबवणार अभियानात रेड क्रॉस तसेच विद्यापीठांना सहभागी करणार असल्याची राज्यपालांची माहिती

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये 'टीबी मुक्त भारत' अभियान राबवले जाईल व राज्याचा आरोग्य विभाग, मुंबई महानगर पालिका तसेच रेड क्रॉस सोसायटी व विद्यापीठांना या कार्यात सहभागी केले जाईल, अशी माहिती राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी दिली.

राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी रेड क्रॉस सोसायटीच्या महाराष्ट्र शाखेची बैठक संपन्न झाली तसेच राज्यातील तीन विद्यापीठांच्या कुलगुरुंची स्वतंत्रपणे बैठक झाली, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

पंतप्रधानांच्या सूचनेनुसार देशव्यापी टीबी मुक्त भारत' अभियान राबवले जात आहे. परंतु लोकसंख्येची घनता अधिक असलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये क्षयरोगाचा प्रसार वेगाने होतो. त्यामुळे मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुंबईतील कुर्ला तसेच इतर भागांमधील झोपडपट्ट्यांमध्ये टीबीमुक्त भारत अभियान राबवले जाईल असे राज्यपालांनी जाहीर केले.

क्षयरोगाची तपासणी लवकर झाल्यास क्षयरोगावर नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे आरोग्य विभाग व पालिकेतर्फे क्षयरोग तपासणी केली जाईल. तर टीबी संदर्भात माहिती, शिक्षण व जनजागृतीचे कार्य रेड क्रॉस महाराष्ट्र शाखेतर्फे केले जाईल.




या अभियानात एनसीसी, स्काऊट – गाईड, रोटरी क्लब, युवा रेड क्रॉस स्वयंसेवक यांना देखल सहभागी करुन घेतले जाईल, असे राज्यपालांनी सांगितले.

क्षय रुग्णांना पौष्टिक आहार देण्याची व्यवस्था करावी. रेड क्रॉस सोसायटीने विद्यापीठांसोबत कार्य करावे व त्यांना देखील आपल्या कार्यात सहभागी करून घ्यावे अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. रेड क्रॉस सोसायटीने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कार्य जोमाने सुरु ठेवावे तसेच ज्या जिल्ह्यांमधील कार्य थांबले आहे तेथे नव्याने सुरु करावे अशी सूचना राज्यपालांनी केली. ज्या जिल्ह्यातर्फे उत्कृष्ट कार्य केले जाईल त्यांना लोक भवनातर्फे योग्य बक्षीस दिले जाईल असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

कृत्रिम प्रज्ञा तंत्रज्ञानाच्या मदतीने क्षयरोगाचा प्रादुर्भाव असलेल्या झोपडपट्ट्या शोधण्याच्या कार्यात विद्यापीठाने मदत करावी अशी सूचना राज्यपालांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या कुलगुरूंना केली.

रेड क्रॉस सोसायटीच्या बैठकीला महाराष्ट्र शाखेचे उपाध्यक्ष सुरेश देवरा व इतर पदाधिकारी उपस्थित होते तर विद्यापीठांच्या बैठकीला मुंबई, 'बाटू' व सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू उपस्थित होते.

□ मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ संपादक –सिध्दार्थ संजय भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे–४११ ००४ येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com